
सायं दैनिक
नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक ५६ • शनिवार दि.२१ नोव्हेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ यांना स्मृतिदिनी 'नांएसो'त अभिवादन



नांदेड/प्रतिनिधी-मराठवाडा मुक्तिसंग्रामाचे अग्रणी नेतृत्व, ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक आणि शिक्षण क्षेत्रातील योगदानासाठी ओळखले जाणारे पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ यांना स्मृतिदिनानिमित्त नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले.

गोविंदभाई श्रॉफ यांनी मराठवाडा मुक्तिसंग्रामात महत्त्वपूर्ण नेतृत्व केले. स्वातंत्र्यलढ्यातील त्यांचे योगदान, शिक्षणप्रसारासाठी केलेले कार्य आणि समाजहितासाठीची त्यांची तळमळ आजही प्रेरणादायी आहे. नांदेड एज्युकेशन सोसायटीचे द्वितीय अध्यक्ष म्हणूनही त्यांनी संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीत मोलाचे योगदान दिले. त्यांच्या सेवाभावी कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, अशी भावना यावेळी *पान ४ वर*

बोगस भरतीतील ७३ शिक्षकांची सेवा समाप्त!

बीडमधील प्रकरण; आणखी २ हजार २१७ संशयित पदांवरील कारवाईकडे लक्ष

बीड:जिल्ह्यातील खासगी अनुदानित शाळांमधील कथित बोगस शिक्षक भरतीचा मोठा गैरप्रकार उघडकीस आला असून, शिक्षण विभागाने धडक कारवाई करत तब्बल ७३ शिक्षकांची सेवा समाप्त केली आहे. यामध्ये प्राथमिक विभागातील ७, तर माध्यमिक विभागातील ६६ शिक्षकांचा समावेश आहे. बनावट विद्यार्थी दाखवून, खोटी कागदपत्रे तयार करून तसेच संचमान्यता प्रक्रियेत कथित फेरफार करून शिक्षकांची नियुक्ती करण्यात आल्याचे चौकशीत समोर आले आहे. या कारवाईमुळे जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली असून, आणखी २ हजार २१७ संशयित पदांवरील नियुक्त्यांवर कारवाईची टांगती तलवार आहे.

राज्यात २०१२ पासून शिक्षक भरतीवर निर्बंध असतानाही बीड जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये शिक्षकांच्या नियुक्त्या झाल्याचा प्रकार समोर आला आहे. न्यायालयीन आदेशांचा चुकीचा अर्थ लावून नियुक्त्या देणे, संचमान्यतेमध्ये फेरफार करणे आणि बनावट विद्यार्थ्यांच्या आधारे शिक्षक पदांची संख्या वाढविणे, अशा प्रकारचे गैरप्रकार झाल्याचा आरोप आहे. या माध्यमातून शासनाची दिशाभूल करून अनुदानित शाळांमध्ये बेकायदेशीर नियुक्त्या करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले होते.या प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते सादेक इनामदार यांनी विशेष तपास पथकाकडे (एसआयटी) तक्रार दाखल केली होती. त्यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यानंतर शिक्षण विभागाने तपासाच्या आधारे ७३ शिक्षकांची सेवा समाप्त करण्याची कारवाई केली. मात्र, हा गैरप्रकार केवळ ७३ नियुक्त्यांपुरता मर्यादित नसून आणखी २ हजार २१७ संशयित पदांचा प्रश्न समोर असल्याने या संपूर्ण प्रकरणाची व्याप्ती मोठी असल्याचे दिसून येत आहे.दरम्यान, जानेवारी २०२३ मध्येही बीड जिल्ह्यात बोगस दिव्यांग प्रमाणपत्रांचा वापर करून बदली मिळविणाऱ्या ५२ शिक्षकांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती. बदली प्रक्रियेत बनावट दिव्यांग प्रमाणपत्रांचा वापर झाल्याचे तपासात उघड झाले होते. त्यानंतर आता बोगस शिक्षक भरतीचा प्रकार समोर आल्याने शिक्षण विभागातील प्रशासकीय कारभार आणि नियुक्ती प्रक्रियेतील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.शिक्षक भरतीच्या नावाखाली बनावट कागदपत्रे, खोटी विद्यार्थीसंख्या आणि संचमान्यतेतील कथित गैरप्रकारांच्या माध्यमातून शासनाची फसवणूक झाली असल्यास त्याची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. ७३ शिक्षकांची सेवा समाप्त केल्यानंतर उर्वरित २ हजार २१७ संशयित पदांबाबत शिक्षण विभाग नेमकी काय भूमिका घेणार, दोषी अधिकारी व संबंधित संस्थाचालकांवर काय कारवाई होणार, याकडे आता शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

जातिअंताशिवाय सामाजिक क्रांती शक्य नाही!-डॉ.आनंद तेलतुंबडे

स्वागताध्यक्ष प्रवीण पाटील यांनी मांडली जातीय मानसिकतेची विदारक उदाहरणे



नांदेड/प्रतिनिधी-भारतीय समाजात जातिव्यवस्था आर्थिक, सामाजिक आणि राजकीय व्यवस्थेत खोलवर रुजलेली आहे. त्यामुळे जातिव्यवस्थेचा अंत केल्याशिवाय खऱ्या अर्थाने सामाजिक क्रांती शक्य नाही. जातीयता निर्मूलनाची लढाई केवळ एका राजकीय पक्षाची किंवा संघटनेची मर्यादित चळवळ न राहता सर्व समविचारी पुरोगामी शक्तींनी एकत्र येऊन ती व्यापक करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. आनंद तेलतुंबडे यांनी केले.

महाराष्ट्र राज्य जातीअंत संघर्ष समितीच्या दुसऱ्या अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी स्वागताध्यक्ष प्रवीण पाटील, माजी खा.रामचंद्र डोम, पॉलीट ब्युरो सदस्य कॉ.अशोक ढवळे, कॉ.विक्रम सिंग, कॉ.अजित नवले, कॉ.विजय गाभणे, कॉ.शैलेंद्र कांबळे, कॉ.बब्रुवाहन पोटभरे, ॲड.कॉ.प्रदीप नागापूरकर, यांच्यासह विविध पुरोगामी चळवळीतील पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. प्रत्येक देशातील ऐतिहासिक, आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीनुसार सामंतशाहीचे स्वरूप वेगळे असते. सामंतशाहीचा अंत झाल्यानंतर जातिव्यवस्था आपोआप नष्ट होईल, अशी अपेक्षा होती; मात्र प्रत्यक्षात तसे घडले नाही. कारण जातिव्यवस्थेची मुळे भारतीय समाजरचनेत खोलवर रुजलेली आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले. जात आणि वर्ग यांचा परस्परसंबंध लक्षात घेऊन भारतीय समाजाचे विश्लेषण करणे आवश्यक आहे. केवळ आर्थिक शोषणाच्या चौकटीत जातीय विषमतेचा प्रश्न समजून घेता येणार नाही. सामाजिक प्रतिष्ठा, सांस्कृतिक वर्चस्व आणि राजकीय सत्तेची रचना यांचाही विचार करावा लागेल. आंतरजातीय विवाह, सांस्कृतिक परिवर्तन आणि जातीय मानसिकतेत बदल घडवून आणणे ही जातिनिर्मूलनाच्या प्रक्रियेतील महत्त्वाची पावले आहेत, असे ते म्हणाले. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावामुळे मानवी श्रमांच्या स्वरूपात मोठे बदल होणार आहेत. या बदलांचा सर्वाधिक परिणाम वंचित आणि श्रमिक घटकांवर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे तंत्रज्ञान, भांडवलशाही, श्रमव्यवस्था आणि सामाजिक विषमता यांचा एकत्रित विचार करून परिवर्तनाची दिशा ठरवावी लागेल, असेही त्यांनी नमूद केले.

जातीअंताची सुरुवात स्वतःच्या घरातूनच व्हावी-प्रविण पाटील

स्वागताध्यक्ष प्रवीण पाटील यांनी जातीयता निर्मूलनाचे आव्हान अत्यंत व्यापक असल्याचे सांगितले. केवळ भाषणे आणि अधिवेशनांमधून जातीयता संपणार नाही, तर प्रत्येकाने स्वतःच्या आचरणात बदल घडवून आणणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले.

कम्युनिस्ट चळवळीतील कार्यकर्त्यांची प्रामाणिकता, समर्पणाची भावना आणि सामाजिक संघर्षातील योगदानाबद्दल त्यांनी आदर व्यक्त केला. लहान वयातच मुलांच्या मनात जातीय भेदभावाचे संस्कार रुजवले जात असल्याची ही गंभीर बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. शिक्षणाचा प्रसार झाल्यानंतर जातीयता कमी होईल, अशी अपेक्षा होती; मात्र प्रत्यक्षात जातीयवाद कमी होण्याऐवजी वाढत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. निवडणुकीत उमेदवाराची गुणवत्ता आणि कार्यापेक्षा त्याची जात पाहून उमेदवारी देण्याची प्रवृत्ती जातीयवादाला बळ देत आहे. जातीयता निर्मूलनाची सुरुवात घरातूनच झाली पाहिजे. समता आणि बंधुतेची मूल्ये केवळ बोलण्यात नव्हे, तर प्रत्यक्ष व्यवहारातही दिसली पाहिजेत. सर्व पुरोगामी आणि समविचारी शक्तींनी एकत्र येऊन ही चळवळ पुढे नेण्याचे आवाहन सीए डॉ.प्रविण पाटील यांनी केले.

दुहेरी लढ्याची गरज -कॉ.अशोक ढवळे

जातीअंताचा लढा लढतांना विषमता आणि सामाजिक स्थिती विरुद्ध प्रखर लढा द्यावा लागणार आहे. भांडवलशाहीतून शोषण आले आहे. जातीयता ही शोषणावर आधारीत असल्याने त्याविरुद्ध सामुहिक लढे उभारण्याची गरज मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे पॉलीट ब्युरो सदस्य कॉ.अशोक ढवळे यांनी केले. यावेळी कॉ.अजित नवले, माजी खा.कॉ.डोम यांचेही भाषणे झाली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन कॉ.उज्वला पडलवार यांनी केले तर आभार प्रदर्शन कॉ.विजय गाभणे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कॉ.गंगाधर गायकवाड, प्राचार्य लक्ष्मण शिंदे, प्रा.बालाजी कोम्पलवार, अशोक सिध्देवाड, डॉ.सचिन सरोदे, कॉ.धरती महाजन, कॉ.मंजुषा कवडे आदींनी परिश्रम घेतले.

पाकिस्तानचे मंत्री मुसादिक मसूद मलिक भारत दौऱ्यावर

नवी दिल्ली:पाकिस्तानचे जलवायू परिवर्तन मंत्री मुसादिक मसूद मलिक हे सध्या भारत दौऱ्यावर आले आहेत. शांघाय सहकार्य संघटनेच्या सभ्यता संवाद परिषदेसाठी ते आले असून त्यांचा हा दौरा प्रचंड चर्चेत आहे. मे २०२५ मधील भारत-पाकिस्तान लष्करी संघर्षानंतर भारतात भेट देणारे ते पहिले पाकिस्तानी केंद्रीय मंत्री ठरले आहेत. मुसादिक मसूद मलिक यांना जगातील सातव्या आश्चर्यांपैकी एक असलेले ताजमहल पाहण्याची परवानगी देण्यात आली आहे.त्याचबरोबर काही अटीही लावण्यात आले आहेत. मुसादिक मसूद मलिक हे लवकरच ताजमहल पाहण्यासाठी जाणार आहेत. *पान ४ वर*

माजी आ.पोकर्णांच्या पुतण्याला कारने चिरडण्याचा प्रयत्न



नांदेड/प्रतिनिधी-माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा यांचे पुतणे तथा आडत व्यापारी कपिल पोकर्णा यांना चारचाकी वाहनाने धडक देऊन जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना नांदेड शहरातील नवीन मोंढा परिसरात गुरुवारी रात्री घडली. भरधाव कार अंगावर घालण्याचा प्रयत्न केल्याची ही घटना परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. या प्रकरणी कपिल पोकर्णा यांच्या तक्रारीवरून हरजी राजेगोरे याच्याविरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जुन्या वादातून तसेच सुमारे ४० लाख रुपयांच्या आर्थिक देवाणघेवाणीवरून हा प्रकार घडल्याचा आरोप करण्यात येत आहे.

कपिल पोकर्णा हे गुरुवारी रात्री सुमारे पावणेदहा वाजण्याच्या सुमारास पत्नीसोबत नवीन मोंढा परिसरात शतपावली करीत होते. याचवेळी एक चारचाकी वाहन भरधाव वेगाने त्यांच्या दिशेने आले. वाहन अंगावर येत असल्याचे लक्षात येताच पोकर्णा यांनी प्रसंगावधान राखून बाजूला उडी घेतली. त्यामुळे ते थोडक्यात बचावले. मात्र, संबंधित वाहनचालकाने गाडी मागे घेऊन पुन्हा त्यांच्या अंगावर घालण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. त्यानंतर वाहनचालक तेथून निघून गेला.या घटनेनंतर काही वेळाने कपिल पोकर्णा हे आपल्या मित्रासोबत रस्त्यावर उभे राहून घडलेल्या प्रकाराबाबत चर्चा करीत होते. त्याचवेळी संबंधित चालक पुन्हा भरधाव वेगाने कार घेऊन त्या ठिकाणी आला. धोका लक्षात येताच पोकर्णा आणि त्यांच्या मित्राने रस्त्याच्या बाजूला होऊन स्वतःचा बचाव केला. या दोन्ही घटनांचे दृश्य परिसरातील *पान ४ वर*

विठ्ठलचरणी दुष्काळमुक्त महाराष्ट्राचे साकडे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची सपत्नीक शासकीय महापूजा

पंढरपूर:कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सपत्नीक शासकीय महापूजा केली. यावेळी पत्नी लता शिंदे, खा.श्रीकांत शिंदे यांच्यासह कुटुंबातील सदस्य उपस्थित होते. विशेष म्हणजे, यंदा राज्यावर दुष्काळाचे संकट असल्याने शेतकऱ्यांना या संकटातून दिलासा मिळावा आणि राज्य दुष्काळमुक्त व्हावे, असे साकडे शिंदे यांनी विठ्ठलाच्या चरणी घातले.



टाळ-मृदुंगाचा गजर, हरिनामाचा जयघोष आणि हजारो भाविकांच्या भक्तिमय वातावरणात कार्तिकी एकादशीची शासकीय महापूजा पार पडली. यावेळी एकनाथ शिंदे यांच्या मांडीवर नातू रुद्रांश असल्याचेही पाहायला मिळाले. शिंदे कुटुंबीयांच्या वतीने विठ्ठलाला सुमारे २५ तोळ्यांचा आकर्षक *पान ४ वर*

नवज्योत फाउंडेशनचा २८ नोव्हेंबरला पालक मेळावा

कुलगुरु डॉ.चासकर,'भाऊराव'चे चेअरमन नरेंद्र चव्हाण,दीपा बियाणी यांचे मार्गदर्शन

नांदेड/प्रतिनिधी-मुलांच्या शिक्षणासह संस्कार, व्यक्तिमत्त्व विकास आणि उज्वल भवितव्याच्या जडणघडणीत पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. याच अनुषंगाने पालकांमध्ये विचारांची देवाणघेवाण व्हावी, अनुभवांची चर्चा व्हावी आणि मुलांच्या सर्वांगीण विकासाच्या विविध पैलूंवर मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने नवज्योत फाउंडेशनच्या वतीने शनिवारी, २८ नोव्हेंबर रोजी पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

हा मेळावा सायंकाळी ५ ते ७ या वेळेत नांदेड येथील जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन येथे होणार आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर जी. चासकर यांच्या हस्ते मेळाव्याचे उद्घाटन होणार आहे. या कार्यक्रमात पालकांना मार्गदर्शन करण्यासाठी दोन प्रतिष्ठित वक्ते उपस्थित राहणार आहेत. भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष नरेंद्र चव्हाण तसेच साहित्यिक आणि संपादक ॲड. दीपा बियाणी हे मुलांचे शिक्षण, संस्कार, व्यक्तिमत्त्व विकास आणि पालकांची जबाबदारी या विषयांवर आपले विचार व अनुभव मांडणार आहेत. आजच्या बदलत्या सामाजिक आणि शैक्षणिक वातावरणात मुलांना योग्य दिशा देणे, त्यांच्यामध्ये चांगले संस्कार रुजविणे आणि त्यांच्या सुप्त गुणांना वाव देणे आवश्यक बनले आहे. या पार्श्वभूमीवर पालकांना एकत्र आणून संवादाचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा नवज्योत फाउंडेशनचा हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.पालकांनी आपल्या व्यस्त वेळापत्रकातून वेळ काढून या मेळाव्यात सहभागी व्हावे, असे आवाहन नवज्योत फाउंडेशनचे अध्यक्ष स.नौनीहालसिंघ जागीरदार यांनी केले आहे.



अ.क्र	लोहा-कंधार तालुक्यातील विविध विकास कामे	रक्कम	वेळ	स्थळ
1	लोहा तालुका क्रीडा संकुलाची सुधारणा करणे.	3.00 कोटी	स.९.०० वा.	क्रीडा संकुल, लोहा
2	लोहा शहरातील विविध विकास कामांचा लोकार्पण सोहळा	90.00 लक्ष	स.१०.०० वा.	बसस्टॅण्ड जवळ लोहा
3	लोहा तालुक्यातील रामा -४४९ किमी १६/०० ते २२/००: लखमाळा-सिंसनगाव-धावरी-गायवाडी-भोपाळवाडी रस्त्याची रुंदीकरणासह सुधारणा करणे. (भाग-लोहा कंधार रोड ते राघवाडी)	5.00 कोटी	स.११.०० वा.	धावरी ता.लोहा
4	कंधार तालुक्यातील कंधार-बाचोटी-बाहळ-तेलूर-कौठा रस्ता रामा-५६ सा.क्र. २४३.००० ते २४५.००० रस्तयाची रुंदीकरणासह सुधारणा करणे. (बाहळ ते तेलूर)	5.00 कोटी	दु.१२.०० वा.	बाहळ ता.कंधार
5	मौ.तेलूर ता.कंधार जि.नांदेड येथे गावातंर्गत सी.सी.रस्ता बंदिस्त नाली बांधकाम करणे.	3.99 कोटी	दु.१२.३० वा.	तेलूर फाटा ता.कंधार
6	मौ.कौठा ता.कंधार जि.नांदेड येथे गावातंर्गत सी.सी.रस्ता बंदिस्तनाली बांधकाम करणे.	4.99 कोटी	दु.१.३० वा.	कौठा ता.कंधार
7	मौ.शिरर जुने ता कंधार जि.नांदेड येथे गावातंर्गत सी.सी.रस्ता बंदिस्तनाली बांधकाम करणे.	2.99 कोटी	दु.२.३० वा.	शिरर नवीन ता.कंधार
8	मौ.शिरर (नवीन) ता.कंधार जि.नांदेड येथे गावातंर्गत सी.सी.रस्ता बंदिस्तनाली बांधकाम करणे.	2.99 कोटी		
9	मौ.चीकी महाकायता कंधार जि.नांदेड येथे गावातंर्गत सी.सी.रस्ता बंदिस्तनाली बांधकाम करणे.	2.99 कोटी		
10	कंधार तालुक्यातील बाचोटी-मंगलसांगवी-सावळेश्वर-चिखली-हाळदा येथे रस्त्यावर झाडाचे वृक्षारोपण करणे. प्रजिमा-५१ ता.कंधार जि.नांदेड	2.35 कोटी	सायं.५.३० वा.	सावळेश्वर ता.कंधार
11	कंधार तालुक्यातील बाचोटी-मंगलसांगवी-सावळेश्वर-चिखली-हळदा प्रजिमा ५१ रस्त्यावर ६/००० येथे लहान पुलाचे बांधकाम करणे.	5.00 कोटी	सायं.६.०० वा.	सावळेश्वर ता.कंधार

- प्रमुख पाहुणे-

मा.सौ.प्रणिताताई देवरे-चिखलीकर (प्रदेश सरचिटणीस, भाजपा महिला मोर्चा,महाराष्ट्र प्रदेश तथा संचालिका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक,नांदेड)
मा.श्री.आनंदराव शिंदे (मा.सभापती,पं.स.,लोहा)
मा.श्री.बाबुराव केंद्रे (मा.सभापती,कृ.उ.बा.समिती,कंधार)
मा.श्री.सुधाकरराव कौसल्य (मा.उपसभापती,कृ.उ.बा.समिती,कंधार)
मा.श्री.मनोहरराव भोसीकर (तालुकाध्यक्ष,राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी,कंधार)
मा.श्री.अशोकराव देशमुख (कौठा,ता.कंधार)
मा.श्री.विलास नरवटे (उपविभागीय अधिकारी,कंधार)
मा.श्री.एस.एन.मांजरमकर (गटविकास अधिकारी,पं.स.,लोहा)
मा.श्री.बालाजी बस्वदे (तेलूर ता.कंधार)
मा.श्री.प्रकाश तोटावाड (मंगलसांगवी, ता.कंधार)
मा.श्री.सोपानराव मोरे (सेवानिवृत्त पोलीस अधिकारी)
मा.सौ.वत्सलाबाई कदम (मा.सरपंच,चौकी महाकाया)
मा.सौ.जनाबाई वाघमारे (मा.सरपंच,बाहळ,ता.कंधार)

मा.श्री.प्रवीण पाटील चिखलीकर (प्रदेश सरचिटणीस,राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, महाराष्ट्र)
मा.श्री.मन्नान चौधरी (उपनगराध्यक्ष,न.प.कंधार)
मा.श्री.स्वप्निल लुंगारे (प्रदेश सचिव,राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी)
मा.श्रीमती चित्राताई लुंगारे (प्रदेश सरचिटणीस,रा.म.कॉं.पा.)
मा.श्री.गंगाप्रसाद यन्नावार (तालुकाध्यक्ष,भाजपा,कंधार)
मा.श्री.सचिन पाटील चिखलीकर (मा.सरपंच,चिखली ता.कंधार)
मा.श्री.रामेश्वर गोरे (तहसिलदार,कंधार)
मा.श्री.महेश पाटील (गटविकास अधिकारी,पं.स.,कंधार)
मा.श्री.बंडू वडजे (लोहा)
मा.श्री.सुभाषराव तोटावाड (मा.सरपंच,मंगलसांगवी ता.कंधार)
मा.सौ.अर्चनाताई शिवकुमार देशमुख (मा.सरपंच,कौठा,ता.कंधार)
मा.श्री.शंकरराव देशमुख (मा.चेअरमन, कौठा, ता.कंधार)
मा.श्री.मारोतराव कटटकर (चेअरमन,तेलूर ता.कंधार)

मा.श्री.शरद पवार (नगराध्यक्ष,न.प.,लोहा)
मा.करिम महोद्दीन मुजावर (उपनगराध्यक्ष,न.प.,लोहा)
मा.श्री.राजेंद्र भोसीकर (चेअरमन,से.स.सो.पानभोसी ता.कंधार)
मा.सौ.अनुसयाताई केंद्रे (गटनेत्या,न.प.,कंधार)
मा.श्री.भगवान राठोड (मा.तालुकाध्यक्ष,भाजपा,कंधार)
मा.श्री.शंकरराव नाईक (मा.उपसरपंच,बाहळ ता.कंधार)
मा.श्री.विठ्ठल परळीकर (तहसिलदार,लोहा)
मा.श्री.सुमित पाटील (उपअभियंता,सा.बां.,लोहा)
मा.श्री.केशवराव मुकदम (नगरसेवक,न.प.,लोहा)
मा.श्री.साहेबराव पोटफोडे (सरपंच,चिखली,ता.कंधार)
मा.श्री.मारोतराव मजरे (मा.सरपंच,बाहळ ता.कंधार)
मा.श्री.सुधाकरराव जाधव (शिरर ता.कंधार)
मा.श्रीमती कमलबाई वाघमारे (मा.सरपंच,तेलूर ता.कंधार)

मा.ॲड.श्री.मुक्तेश्वर धोंडगे (प्रदेश संपर्क सचिव,रा.कॉं.पा.)
मा.जफरोद्दी वाहोद्दीन (मा.उपनगराध्यक्ष,न.प.कंधार)
मा.श्री.किशनराव डफडे (चेअरमन, खोरी सिक्रीसंघ,कंधार)
मा.श्री.भास्कर पवार (गटनेते,न.प.लोहा)
मा.श्री.साहेबराव काळे (संचालक,कृ.उ.बा.समिती,लोहा)
मा.श्री.दत्ता वाले (मा.उपनगराध्यक्ष,न.प.,लोहा)
मा.श्री.रामकृष्ण गळधर (कार्यकारी अभियंता, सा.बां.,नांदेड)
मा.श्री.सचिन आयतलवाड (उपअभियंता,सा.बां.,कंधार)
मा.श्री.केशवराव कदम (मा.सरपंच,सावळेश्वर,ता.कंधार)
मा.श्री.धोंडिराम बोडलवार (मा.सदस्य,जि.प.,नांदेड)
मा.श्री.शिवाजीराव वाकोरे (सरपंच,काटकळंबा ता.कंधार)
मा.श्री.अच्युत पवळे (उपसरपंच,चिखली,ता.कंधार)
मा.श्री.नानाराव कदम (मंगलसांगवी ता.कंधार)

मा.श्री.संजय देशमुख (सभापती,कृ.उ.बा.समिती, कंधार)
मा.श्री.किरण वट्टमवार (मा.नगराध्यक्ष,न.प.लोहा)
मा.श्री.अण्णासाहेब पवार (उपसभापती,कृ.उ.बा.समिती,लोहा)
मा.श्री.छत्रपती स्वामी (तालुकाध्यक्ष,राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी,लोहा)
मा.श्री.बाबुराव देशमुख (कौठा,ता.कंधार)
मा.श्री.नारायणराव कुंभारे (चेअरमन,स.से.बाहळ ता.कंधार)
मा.श्री.भैरवनाथ नाईकवाडी (जिल्हा क्रिडाधिकारी,नांदेड)
मा.श्री.जयप्रकाश तपघले (तालुका क्रिडाधिकारी,नांदेड)
मा.श्री.साईनाथ कोळगीरे (काटकळंबा ता.कंधार)
मा.श्री.उद्धव पाटील चितळीकर (मा.सदस्य,पं.स.,लोहा)
मा.श्री. बालासाहेब बाबाराव शिंदे (शिरर ता.कंधार)
मा.श्री.रामदास कापसे (उपसरपंच,कौठा ता.कंधार)
मा.श्री.मारोती संभाजी पाटील (चौकी महाकाया, ता.कंधार)

ई-केवायसीचा अडथळा दूर करा!

शेतकऱ्यांवर नैसर्गिक संकट कोसळले की, सरकारकडून मदतीच्या घोषणा केल्या जातात. पंचनामे होतात, नुकसानभरपाईचे निकष जाहीर होतात आणि मदतीची प्रक्रिया सुरू झाल्याचे सांगितले जाते. मात्र प्रत्यक्ष मदत शेतकऱ्यांच्या हातात पोहोचेपर्यंत अनेक अडथळ्यांची मालिका सुरू होते. कधी कागदपत्रांची पूर्तता, कधी बँक खात्यातील त्रुटी, तर कधी ई-केवायसीची प्रक्रिया. संकटग्रस्त शेतकऱ्याला दिलासा देण्याऐवजी सरकारी यंत्रणेच्या दारात चकरा मारण्याची वेळ येत असेल, तर ही व्यवस्था नेमकी कोणासाठी आहे?, असा प्रश्न उपस्थित होतो.महाराष्ट्रातील शेतकरी गेल्या काही वर्षांपासून नैसर्गिक संकटांचा सामना करीत आहे. कधी अतिवृष्टी, कधी अवकाळी पाऊस, तर कधी पावसातील खंडामुळे पिकांचे मोठे नुकसान होत आहे. मराठवाड्यातील शेतकऱ्यांची परिस्थिती तर अधिकच बिकट आहे. सलग काही वर्षे अतिवृष्टी आणि ओल्या दुष्काळाचा सामना केल्यानंतर यंदा अनेक भागांत पाणीटंचाईचे संकट निर्माण झाले आहे. पेरणीपासून काढणीपर्यंत शेतकऱ्याला अनिश्चिततेचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत शासनाकडून जाहीर होणारी आर्थिक मदत ही शेतकऱ्यांसाठी मोठा आधार असते. परंतु तीच मदत तांत्रिक अडचणींमध्ये अडकत असेल तर शेतकऱ्यांच्या अडचणी आणखी वाढतात.शासनाच्या मदतीसाठी ई-केवायसी अनिवार्य करण्यामागे लाभार्थ्यांची ओळख निश्चित करणे, अपात्र व्यक्तींना लाभ मिळू न देणे आणि आर्थिक व्यवहारात पारदर्शकता राखणे हा उद्देश असू शकतो. मात्र या प्रक्रियेमुळे प्रत्यक्ष नुकसानग्रस्त शेतकरीच मदतीपासून वंचित राहत असेल तर त्याचा पुनर्विचार होणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील अनेक शेतकऱ्यांना ऑनलाइन प्रक्रिया हाताळता येत नाही. काही ठिकाणी इंटरनेटची समस्या आहे, तर काही शेतकऱ्यांच्या आधार कार्ड आणि बँक खात्यातील माहितीमध्ये तफावत आहे. बोटांचे ठसे जुळत नसल्याने किंवा तांत्रिक अडचणींमुळे ई-केवायसी पूर्ण होत नाही. अशा परिस्थितीत शेतकऱ्याने नेमके कोणाकडे दाद मागायची? विशेष म्हणजे, शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे की नाही, याची पाहणी करण्यासाठी महसूल आणि कृषी विभागाचे अधिकारी पंचनामे करतात. तलाठी, मंडळ अधिकारी आणि कृषी सहाय्यकांच्या माध्यमातून नुकसानीची नोंद केली जाते. मग एकदा नुकसान निश्चित झाल्यानंतर केवळ तांत्रिक प्रक्रियेमुळे मदत रोखण्याची वेळ का यावी? शासकीय यंत्रणेकडे उपलब्ध असलेल्या नोंदींचा वापर करून पात्र शेतकऱ्यांना मदत देण्याचा पर्यायी मार्ग का शोधला जाऊ नये? शासनाने ई-केवायसीची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी गावपातळीवर विशेष शिबिरे आयोजित करावीत. ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय आणि कृषी विभागाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे. ज्यांची ई-केवायसी तांत्रिक कारणांमुळे पूर्ण होत नाही, अशा शेतकऱ्यांसाठी पर्यायी पडताळणीची व्यवस्था असावी. बँक खात्यातील त्रुटी दुरुस्त करण्यासाठी विशेष मदत केंद्रे सुरू करावीत. पात्र शेतकऱ्यांची यादी ग्रामपंचायत स्तरावर प्रसिद्ध करून त्यांना आपल्या अर्जाची स्थिती समजेल, अशी पारदर्शक व्यवस्था निर्माण करावी. शेतकऱ्यांना मदत देताना केवळ घोषणा करून सरकारची जबाबदारी संपत नाही. मदत वेळेत आणि योग्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणे हीच खरी कसोटी आहे. संकटाच्या काळात शेतकऱ्याला पैशांची नितांत गरज असते. बियाणे, खते, औषधे, जनावरांचा चारा, कुटुंबाचा उदरनिर्वाह आणि बँकेचे कर्ज अशा अनेक जबाबदाऱ्या त्याच्यावर असतात. अशा वेळी मदत मिळण्यासाठी महिनोनमहिने प्रतीक्षा करावी लागणे अन्यायकारक आहे. शेतकरी हा शासनाच्या योजनांचा लाभार्थी असला तरी तो केवळ आकडेवारीतील एक क्रमांक नाही. त्याच्या कष्टावर अन्नधान्याची व्यवस्था उभी आहे. त्यामुळे त्याला मदत देताना नियमांचा अडसर निर्माण करण्याऐवजी नियमांमध्ये मानवी दृष्टिकोन ठेवणे गरजेचे आहे. गैरव्यवहार रोखण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर व्हायलाच हवा; मात्र तंत्रज्ञान हे शेतकऱ्यांच्या मदतीचे साधन बनले पाहिजे, अडथळा नव्हे. सरकारने तातडीने ई-केवायसीतील त्रुटी दूर करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी आणि पात्र शेतकऱ्यांची नुकसानभरपाई विनाविलंब त्यांच्या खात्यात जमा करावी. कारण संकटात सापडलेल्या शेतकऱ्याला आश्वासनांची नव्हे, तर प्रत्यक्ष मदतीची गरज आहे. शेतकऱ्यांच्या जखमेवर मदतीचा हात ठेवायचा की; कागदपत्रांच्या अटींचे ओझे लादायचे, याचा निर्णय आता शासनाने घ्यायला हवा.

भ्रामक कल्पनांच्या मागे न लागता शाश्वत संकल्प करा!

आजच्या आधुनिक युगात माणसाचे जीवन अनेक समस्यांनी वेढलेले आहे. बदलती जीवनशैली, वाढत्या अपेक्षा, स्पर्धा, आर्थिक अस्थिरता, सामाजिक ताणतणाव आणि मानसिक अस्वस्थता यामुळे माणूस सतत काहीतरी शोधण्याच्या प्रयत्नात असतो. सुख, समाधान, यश आणि शांतता मिळविण्यासाठी त्याची धडपड सुरू असते. मात्र, या धडपडीत अनेकदा तो योग्य मार्गापासून भरकटतो. वास्तवापेक्षा आकर्षक वाटणाऱ्या कल्पनांना महत्त्व देतो आणि भ्रामक विचारांच्या आहारी जातो. काही काळ त्याला या कल्पनांमधून समाधान मिळाल्याचा भास होतो; परंतु ते समाधान चिरकाल टिकणारे नसते. कारण भ्रामक कल्पना माणसाला क्षणिक आनंद देऊ शकतात, पण जीवनाला शाश्वत दिशा देऊ शकत नाहीत. म्हणूनच आजच्या काळात भ्रामक कल्पनांच्या मागे लागण्यापेक्षा शाश्वत मूल्यांचा स्वीकार करून जीवनाला योग्य दिशा देण्याची गरज निर्माण झाली आहे.



शाश्वत म्हणजे जे काळाच्या कसोटीवर टिकून राहते, ज्याचे महत्त्व परिस्थिती बदलली तरी कमी होत नाही आणि जे मानवी जीवनाला सातत्याने सकारात्मक दिशा देते. सत्य, प्रामाणिकपणा, करुणा, माणुसकी, विवेक, परस्परविश्वास आणि सामाजिक बांधिलकी ही शाश्वत मूल्यांची उदाहरणे आहेत. या मूल्यांमुळे माणसाच्या व्यक्तिमत्त्वाला स्थैर्य प्राप्त होते. त्याच्या विचारांना दिशा मिळते आणि कृतीला योग्य अधिष्ठान मिळते. याउलट भ्रामक कल्पना या वास्तवापासून दूर नेणाऱ्या असतात. त्या आकर्षक वाटतात; परंतु त्यांचा पाया अनेकदा अपुऱ्या माहितीवर, चुकीच्या समजुतींवर किंवा अवास्तव अपेक्षांवर आधारलेला असतो. त्यामुळे अशा कल्पनांमध्ये गुंतलेला माणूस काही काळ स्वतःला योग्य मार्गावर असल्याचे समजत असला, तरी प्रत्यक्षात त्याची दिशाभूल होत असते. मानवी जीवनात श्रद्धा आणि आध्यात्मिकतेलाही महत्त्वाचे स्थान आहे. ईश्वरी शक्तीवरील श्रद्धा, आत्मिक समाधान आणि अंतर्मनातील शांतता यांचा अनुभव प्रत्येक व्यक्ती वेगवेगळ्या प्रकारे घेत असते. मात्र, श्रद्धा आणि भ्रामक कल्पना यांतील फरक समजून घेणे आवश्यक आहे. श्रद्धा माणसाला चांगले वागण्याची, दुसऱ्यांच्या दुःखात सहभागी होण्याची आणि नैतिक जीवन जगण्याची प्रेरणा देत असेल, तर ती सकारात्मक आहे. परंतु श्रद्धेच्या नावाखाली अवास्तव दावे, अंधानुकरण, भीती आणि शोषण यांना प्रोत्साहन दिले जात असेल, तर त्याबाबत प्रश्न विचारणे आवश्यक ठरते. कोणत्याही गोष्टीचा स्वीकार केवळ ती आकर्षक वाटते म्हणून न करता तिची सत्यता आणि परिणाम तपासून पाहणे हीच विवेकशीलतेची खरी कसोटी आहे.

आजच्या काळात माणसाचे मन एका विचारातून दुसऱ्या विचाराकडे वेगाने धावत असते. प्रसारमाध्यमे, समाजमाध्यमे, जाहिराती आणि विविध प्रकारचे संदेश यांचा त्याच्या विचारांवर मोठा प्रभाव पडत आहे. एखादी गोष्ट वारंवार समोर आली की ती खरी असावी, असा समज निर्माण होतो. आकर्षक चित्रे, प्रभावी भाषणे, चमत्कारांचे दावे आणि मोठमोठी आश्वासने यामुळे माणूस सहज प्रभावित होतो. मात्र, या सर्व गोष्टींच्या पाठीमागील वास्तव तपासण्याची सवय त्याच्यात कमी होत चालली आहे. परिणामी, सत्यापेक्षा दिखाव्याला आणि गुणवत्तेपेक्षा प्रसिद्धीला अधिक महत्त्व मिळत आहे. ही प्रवृत्ती केवळ व्यक्तीच्या जीवनासाठीच नव्हे, तर संपूर्ण समाजासाठी चिंताजनक आहे. एका इंग्रजी म्हणीत म्हटले आहे, "All that glitters is not gold." म्हणजेच चमकणारी प्रत्येक वस्तू सोने नसते. या म्हणीचा अर्थ केवळ भौतिक वस्तूंपुरता मर्यादित नाही. मानवी जीवनातील अनेक प्रसंगांना ती तितकीच लागू पडते. एखादी व्यक्ती बाह्यतः कितीही प्रभावशाली दिसत असली, तरी तिचे विचार आणि कृती योग्य असतीलच असे नाही. एखादी योजना आकर्षक वाटत असली, तरी तिचा प्रत्यक्ष फायदा होईलच असे नाही. एखादे आश्वासन मोठे असले, तरी त्याची पूर्तता होईलच असे नाही. त्यामुळे बाह्य चकाकीला भुलण्याऐवजी त्यामागील सत्य शोधण्याची वृत्ती विकसित करणे गरजेचे आहे.

माणूस जेव्हा भ्रामक कल्पनांच्या आहारी जातो, तेव्हा त्याच्या विचारशक्तीवर परिणाम होऊ लागतो. चांगले आणि वाईट यांतील फरक ओळखण्याची क्षमता कमी होते. योग्य-अयोग्य ठरविण्याऐवजी तो भावनेच्या भरात निर्णय घेऊ लागतो. अशा वेळी त्याला योग्य मार्गदर्शन करणाऱ्या व्यक्ती आणि संस्था यांच्यापासूनही तो दूर जातो. परिणामी, चांगल्या गुणांचा स्वीकार करण्याऐवजी दुर्गुणांच्या प्रभावाखाली त्याचे जीवन जाऊ लागते. स्वतःच्या चुका मान्य करण्याची तयारी राहत नाही. आपल्या अपयशाचे खापर दुसऱ्यांवर फोडण्याची प्रवृत्ती वाढते. ही अवस्था व्यक्तीच्या विकासात अडथळा निर्माण करणारी ठरते. विशेष म्हणजे, भ्रामक कल्पनांमध्ये अडकलेला माणूस अनेकदा स्वतःच्या विचारांनाच अंतिम सत्य मानू लागतो. त्याच्या मताशी सहमत नसणाऱ्या व्यक्तींचे विचार ऐकण्याची त्याची तयारी नसते. प्रश्न विचारणाऱ्यांना विरोधक समजले जाते आणि सत्याची पडताळणी करणाऱ्यांवरच संशय घेतला जातो. अशा वातावरणात संवाद संपतो आणि मतभेदांचे रूपांतर संघर्षात होते. कुटुंबात, समाजात आणि सार्वजनिक जीवनातही याचे दुष्परिणाम दिसून येतात. परस्परविश्वास कमी होतो आणि संशयाची भावना वाढीस लागते. त्यामुळे समाजात एकोपा टिकवायचा असेल, तर विवेकशील विचारांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.



दत्तोपंत डहाळे
नांदेड.

आपण एकविसाव्या शतकात जगत आहोत. विज्ञान, तंत्रज्ञान, वैद्यकीय संशोधन, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि माहितीच्या क्षेत्रात प्रचंड बदल घडत आहेत. जग जवळ आले आहे. काही क्षणांत जगाच्या कोणत्याही भागातील माहिती आपल्यापर्यंत पोहोचू शकते. मात्र, माहिती उपलब्ध असणे आणि त्या माहितीचे योग्य आकलन असणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. आज माहितीचा स्फोट झाला असला, तरी विवेकाचा विकास तितक्याच वेगाने होत आहे का, हा प्रश्न उपस्थित होतो. चुकीची माहिती, अफवा, अंधश्रद्धा आणि दिशाभूल करणारे संदेश यांमुळे अनेक जण वास्तवापासून दूर जात आहेत. भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी केवळ तांत्रिक प्रगती पुरेशी नाही, तर विचारांची प्रगल्भताही आवश्यक आहे. शाश्वत मूल्यांचे महत्त्व याच ठिकाणी अधोरेखित होते. प्रामाणिकपणा, कष्ट करण्याची तयारी, सत्याचा स्वीकार, दुसऱ्यांच्या मतांचा आदर, सामाजिक जबाबदारी आणि माणुसकी या गोष्टी कधीही कालबाह्य होत नाहीत. परिस्थिती कितीही बदलली, तरी या मूल्यांची गरज कायम राहते. तंत्रज्ञान माणसाला सुविधा देऊ शकते; परंतु त्याचा योग्य वापर करण्यासाठी विवेकाची आवश्यकता असते. पैसा सुखसोयी उपलब्ध करून देऊ शकतो; परंतु मनःशांतीची हमी देऊ शकत नाही. सत्ता अधिकार देऊ शकते; परंतु समाजाचा विश्वास मिळविण्यासाठी प्रामाणिकपणा आवश्यक असतो. त्यामुळे जीवनात काय मिळविले यापेक्षा ते मिळविताना कोणती मूल्ये जपली, यालाही महत्त्व दिले पाहिजे. समाजात अंधश्रद्धा वाढण्यामागेही विवेकाचा अभाव हे एक महत्त्वाचे कारण आहे. एखाद्या गोष्टीची सत्यता तपासण्याऐवजी तिच्यावर डोळे झाकून विश्वास ठेवला जातो. चमत्कारांच्या नावाखाली लोकांची दिशाभूल केली जाते. भीती, असुरक्षितता आणि अज्ञान यांचा फायदा घेऊन काही जण स्वतःचे हित साधतात. अशा प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी केवळ कायदे करून चालणार नाही. समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन, चिकित्सक विचार आणि प्रश्न विचारण्याची संस्कृती विकसित करावी लागेल. शिक्षणसंस्था, कुटुंबव्यवस्था, प्रसारमाध्यमे आणि सामाजिक संघटनांनी यासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे. कोणतीही गोष्ट ऐकली म्हणून खरी मानण्याऐवजी तिची कारणमीमांसा करण्याची सवय प्रत्येकाने लावून घेतली पाहिजे.

विवेक असलेल्या व्यक्तीची भूमिका याबाबतीत महत्त्वाची ठरते. विवेक म्हणजे केवळ बुद्धिमत्ता नव्हे, तर योग्य आणि अयोग्य यांतील फरक समजून घेण्याची क्षमता होय. विवेकी माणूस कोणत्याही गोष्टीचा स्वीकार करण्यापूर्वी तिची पडताळणी करतो. पुरावे, अनुभव आणि वस्तुस्थिती यांच्या आधारे निर्णय घेतो. स्वतःच्या विचारांमध्ये चूक असू शकते, हे मान्य करण्याची त्याची तयारी असते. मात्र, दुर्दैवाने अशा विवेकशील भूमिकेवरही अनेकदा शंका घेतली जाते. प्रश्न विचारणाऱ्यांना नकारात्मक समजले जाते. यामुळे समाजात चिकित्सक विचार करणाऱ्यांचा आवाज कमी होण्याचा धोका निर्माण होतो. लोकशाही समाजासाठी ही बाब योग्य नाही. कारण प्रश्न विचारणे म्हणजे विरोध करणे नव्हे, तर सत्याच्या अधिक जवळ जाण्याचा प्रयत्न करणे होय. आज प्रत्येकाने स्वतःच्या जीवनाकडेही प्रामाणिकपणे पाहण्याची गरज आहे. आपण कोणत्या गोष्टींवर विश्वास ठेवतो, कोणत्या कारणाने निर्णय घेतो आणि आपल्या कृतींचा इतरांवर काय परिणाम होतो, याचा विचार केला पाहिजे. केवळ दुसऱ्यांच्या चुका शोधण्यापेक्षा स्वतःच्या वर्तनाचे परीक्षण करणे अधिक महत्त्वाचे आहे. आपल्या विचारांमध्ये आणि कृतींमध्ये सुसंगती असली पाहिजे. समाजात बदल घडविण्याची अपेक्षा करताना स्वतःच्या आचरणातही बदल घडवून आणावा लागतो. चांगल्या गोष्टींचा स्वीकार केवळ बोलण्यातून नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीतून झाला पाहिजे. हीच शाश्वत जीवनमूल्यांची खरी ओळख आहे. भविष्यात अनेक नवी आव्हाने निर्माण होणार आहेत. पर्यावरणीय संकट, पाणीटंचाई, आर्थिक विषमता, बेरोजगारी, सामाजिक तणाव आणि तंत्रज्ञानाचा गैरवापर अशा अनेक समस्यांना मानवजातीला सामोरे जावे लागणार आहे. या समस्यांवर उपाय शोधताना भ्रामक आश्वासनांपेक्षा वास्तववादी नियोजन, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता असेल. केवळ घोषणा करून किंवा भावनिक आवाहने करून प्रश्न सुटणार नाहीत. त्यासाठी ठोस कृती, जबाबदारीची जाणीव आणि दीर्घकालीन विचार आवश्यक आहे. शाश्वत संकल्प म्हणजे केवळ एखादी प्रतिज्ञा करणे नव्हे, तर त्या संकल्पाच्या पूर्ततेसाठी सातत्याने प्रयत्न करणे होय. माणसाने स्वतःच्या जीवनात कोणत्या गोष्टींना प्राधान्य द्यायचे, हे ठरविण्याची वेळ आली आहे. क्षणिक आकर्षण, खोटा प्रतिष्ठाभाव आणि भ्रामक कल्पनांच्या मागे धावण्यापेक्षा सत्य, सदाचार, विवेक आणि माणुसकी यांचा मार्ग स्वीकारला पाहिजे. दुसऱ्यांवर विश्वास ठेवताना डोळसपणा असावा आणि स्वतःच्या विचारांवरही वेळोवेळी प्रश्न विचारण्याची तयारी ठेवावी. श्रद्धा असावी; परंतु ती विवेकाच्या विरोधात नसावी. प्रगतीची आकांक्षा असावी; परंतु ती नैतिकतेपासून दूर नेणारी नसावी. स्वप्ने पाहावीत; परंतु त्यांची पूर्तता करण्यासाठी वास्तवाचे भान आणि कष्ट करण्याची तयारीही असावी.

शेवटी, माणसाचे खरे मोठेपण त्याच्या बाह्य चकाकीत नसून त्याच्या विचारांत, कृतीत आणि जपलेल्या मूल्यांत असते. भ्रामक कल्पना काही काळ मनाला भुरळ घालू शकतात; मात्र शाश्वत मूल्येच जीवनाला स्थैर्य, समाधान आणि अर्थ देतात. त्यामुळे प्रत्येकाने स्वतःच्या विवेकाला जागृत ठेवून जीवनातील प्रत्येक कृतीची तपासणी केली पाहिजे. दुसऱ्यांच्या दोषांवर बोट ठेवण्यापूर्वी स्वतःच्या वर्तनाची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. परस्परविश्वास, सहकार्य आणि माणुसकी यांचे संवर्धन केले पाहिजे. भ्रामकतेचा त्याग आणि शाश्वत मूल्यांचे संगोपन हाच व्यक्तीच्या तसेच समाजाच्या उज्ज्वल भविष्याचा मार्ग आहे. कारण क्षणिक आकर्षणाच्या मागे धावणारा माणूस दिशाहीन होतो; परंतु विवेक आणि शाश्वत संकल्पांच्या आधारावर चालणारा माणूसच जीवनाला खरा अर्थ प्राप्त करून देतो.

ग्रामीण पत्रकारितेचा राष्ट्रीय गौरव;रशीद फाजलानी यांना'राष्ट्रीय सेवा रत्न'पुरस्कार

किनवट/प्रतिनिधी-सारखणी येथील पत्रकार रशीद फाजलानी यांना प्रतिष्ठेच्या 'राष्ट्रीय सेवा रत्न पुरस्कार २०२६' ने सन्मानित करण्यात आले. छत्रपती संभाजीनगर येथील मौलाना आझाद रिसर्च सेंटर येथे १६ नोव्हेंबर रोजी आयोजित विशेष सोहळ्यात मान्यवरांच्या शुभहस्ते त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. बातमीच्या माध्यमातून जनतेचा आवाज बनलेल्या पत्रकारांच्या कार्याचा हा सन्मान केवळ एका व्यक्तीचा गौरव नसून ग्रामीण पत्रकारितेचा सन्मान असून सामाजिक कार्याच्या बांधिलकीची जबाबदारी वाढल्याचे पुरस्काराला उत्तर देताना त्यांनी मनोगत व्यक्त केले.

सहारा एज्युकेशन अँड वेल्फेअर फाउंडेशन महाराष्ट्र यांच्या वतीने भारताचे पहिले केंद्रीय शिक्षणमंत्री आणि स्वातंत्र्यसैनिक मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंतीचे औचित्य साधून या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.या सोहळ्याला आ.विक्रम काळे, मौलाना आझाद अल्पसंख्याक महामंडळाचे संचालक सलीम सारंग, सिनेअभिनेते अतुल मोरे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती होती. याच मान्यवरांच्या हस्ते पत्रकार रशीद फाजलानी यांना राष्ट्रीय सेवा रत्न पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.पत्रकार रशीद फाजलानी यांनी किनवटसारख्या दुर्गम आणि आदिवासीबहुल भागात ग्रामीण पत्रकारितेच्या माध्यमातून आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. पत्रकारितेच्या प्रवासात त्यांनी सहारा समय, स्वदेश न्यूज, लेमन न्यूज आणि देश न्यूज यांसारख्या नामांकित वृत्तवाहिन्यांसाठी काम केले. तसेच नवभारत, लोकशाही वार्ता, दैनिक गावकरी आणि सामना यांसारख्या वृत्तपत्रांमध्ये बातमीदार म्हणून त्यांनी आपल्या लेखणीचा ठसा उमटवला आहे. सध्या ते 'मराठवाडा न्यूज' या यूट्यूब न्यूज चॅनलचे मुख्य संपादक आहेत.

गुन्हेगारी, राजकीय घडामोडी, सामाजिक प्रश्न, प्रशासकीय कारभार तसेच ग्रामीण भागातील विकासाच्या विविध विषयांवर त्यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून सातत्याने प्रकाश टाकला आहे. सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न, ग्रामीण भागातील समस्या आणि जनतेच्या हक्कांसाठी पत्रकारितेच्या माध्यमातून आवाज उठवण्याचे काम त्यांनी केले. निर्भीड, अभ्यासपूर्ण आणि वस्तुनिष्ठ पत्रकारितेच्या जोरावर त्यांनी पत्रकारिता क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवला आहे.



कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल


पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची दखल घेत सहारा एज्युकेशन अँड वेल्फेअर फाउंडेशन महाराष्ट्र यांच्या वतीने त्यांची राष्ट्रीय सेवा रत्न पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. छत्रपती संभाजीनगर येथे मान्यवरांच्या हस्ते झालेला हा सन्मान त्यांच्या पत्रकारितेच्या प्रवासातील एक महत्त्वपूर्ण गौरव मानला जात आहे.या पुरस्कारामुळे किनवट तालुक्यासह नांदेड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, पत्रकारिता क्षेत्रातून रशीद फाजलानी यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

ग्रामीण भागातील सामान्य माणसाचा आवाज बुलंद करणाऱ्या पत्रकारितेचा हा सन्मान निश्चितच नव्या पिढीतील पत्रकारांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. बातमीच्या माध्यमातून जनतेचा आवाज बनलेल्या पत्रकाराच्या कार्याचा हा सन्मान केवळ एका व्यक्तीचा गौरव नसून ग्रामीण पत्रकारितेचा सन्मान आहे.

भाजपच्या तृतीयपंथी प्रकोष्ठाच्या मराठवाडा सहसंयोजकपदी फरीदा बकश यांची नियुक्ती

नायगाव/प्रतिनिधी-भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्रजी चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच महाराष्ट्र प्रदेश तृतीयपंथी प्रकोष्ठाच्या प्रदेश प्रभारी डॉ. सान्वी जेठवाणी यांच्या सूचनेनुसार पक्षाच्या तृतीयपंथी प्रकोष्ठातील संघटनात्मक नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. यामध्ये मराठवाडा विभागाच्या सहसंयोजकपदी फरीदा बकश यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

भाजपच्या तृतीयपंथी प्रकोष्ठाच्या प्रदेश संयोजकपदी मनिषा पुणेकर यांची निवड करण्यात आली असून, विविध विभागांच्या सहसंयोजकपदांसाठीही नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. यामध्ये ठाणे-कोकण विभागातून छकुली बनसोडे, मराठवाड्यातून फरीदा बकश, पूर्व विदर्भातून राणी धवळे, पश्चिम विदर्भातून सिमरन अम्मा, पश्चिम महाराष्ट्रातून कादंबरी बनसोडे आणि उत्तर महाराष्ट्रातून शुभांगी शिंदे यांची सहसंयोजकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या सर्व नियुक्त्या तात्काळ प्रभावाने लागू करण्यात आल्या आहेत. तृतीयपंथीय समाजाच्या विविध समस्या, हक्क आणि विकासाचे प्रश्न पक्षाच्या माध्यमातून मांडणे, तसेच या समाजघटकाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी संघटनात्मक स्तरावर काम करण्याची जबाबदारी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे.फरीदा बकश या कमल फाउंडेशनचे श्री. अमर गोधने यांच्या सहकार्याने विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत आहेत. सामाजिक कार्यातील त्यांचा सहभाग आणि समाजासाठी सुरू असलेल्या उपक्रमांच्या पार्श्वभूमीवर त्यांच्यावर मराठवाडा सहसंयोजकपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. फरीदा बकश यांच्या नियुक्तीबद्दल श्री श्री श्री १००८ महंत ज्ञानेश्वर भारतीजी महाराज, क्षेत्र माहूरगड, खा.डॉ. अजित गोपछडे, आ. श्रीजया चव्हाण, भारतीय जनता पार्टी उत्तर महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा तथा नांदेड जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. मंगाराणीताई आंबुलगेकर, भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या दक्षिण जिल्हाध्यक्षा सौ. अनिताताई चोंडीकर, केंद्रीय सेन्सर बोर्ड सदस्य रुपेश पाटील भोकसखेडकर आणि नांदेड येथील गुरु श्री रंजीता नायक यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्रातील विविध भागांतील तृतीयपंथी समुदायाच्या वतीने त्यांना शुभेच्छा देऊन नव्या जबाबदारीसाठी शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला.



सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
मुख्यसंपादक-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
सहसंपादक-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

दिवाळी संपली,सुट्ट्याही संपल्या, पण सरकारी बाबूचा सुट्टीचा मूड कायम

धर्माबाद/प्रतिनिधी-दिवाळीचा सण संपला, सुट्ट्याही संपल्या; मात्र धर्माबाद तालुक्यातील काही शासकीय कार्यालयांमधील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा सुट्टीचा मूड अद्याप संपलेला दिसत नाही. कार्यालये सुरू झाली असली तरी अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कथित अनुपस्थितीमुळे शासकीय कामकाजाचा बोजवारा उडत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे. दिवाळी संपली, पण सरकारी बाबूंची दिवाळी अजूनही सुरूच आहे का? असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे.

दिवाळीच्या सुट्ट्यांनंतर आपली महत्त्वाची शासकीय कामे मार्गी लागतील, या अपेक्षेने ग्रामीण भागातील नागरिक कृषी कार्यालय, तहसील कार्यालय, पंचायत समिती, भूमिअभिलेख कार्यालयासह विविध शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवत आहेत. मात्र संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी उपस्थित नसल्याने अनेक नागरिकांना रिकाम्या हाताने परतावे लागत असल्याची तक्रार आहे.एखादा दाखला मिळवायचा असो, शासकीय योजनेचा लाभ घ्यायचा असो किंवा अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या कामाचा पाठपुरावा करायचा असो, सामान्य नागरिकांना वारंवार कार्यालयाचे हेलपाटे मारावे लागत आहेत. शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकरी नागरिक आपला रोजगार बुडवून कार्यालयात येतात; मात्र अधिकारीच जागेवर नसतील तर त्यांनी दाद मागायची तरी कोणाकडे?सामान्य नागरिकांनी शासकीय कार्यालयात वेळेवर उपस्थित राहावे, नियमांचे पालन करावे, कागदपत्रांची पूर्तता करावी, अशी अपेक्षा प्रशासनाकडून केली जाते. मग अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबत प्रशासनानेही तितकीच कठोर भूमिका घेणे गरजेचे नाही का? नागरिकांसाठी नियम कडक आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी मात्र मोकळीक, असा दुहेरी न्याय का?

धर्माबाद तालुक्यातील शासकीय कार्यालयांमध्ये अधिकारी व कर्मचारी वेळेवर उपस्थित आहेत की नाहीत, यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी संबंधित विभागप्रमुख आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची आहे. मात्र कार्यालयांमधील कथित अनियमिततेबाबत वरिष्ठ प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.जिल्हा प्रशासनाने या प्रकाराची गांभीर्याने दखल घेऊन धर्माबाद तालुक्यातील विविध शासकीय कार्यालयांची अचानक तपासणी करावी. उपस्थिती रजिस्टर, बायोमेट्रिक हजेरी आणि प्रत्यक्ष कार्यालयीन कामकाजाची पडताळणी करावी. कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

बाळासाहेबांच्या छायाचित्राच्या विडंबनावरुन शिवसैनिक आक्रमक

शायना एन.सी. यांच्या अटकेची मागणी



किनवट/प्रतिनिधी-हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या छायाचित्राची जाणीवपूर्वक तोडफाड करून विडंबन केल्याप्रकरणी शायना एन.सी. यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तात्काळ अटक करावी अशा मागणीचे निवेदन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने किनवट पोलीसात देण्यात आल्याचे प्रसिद्धीसाठी दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे हे लाखो शिवसैनिकांचे श्रद्धास्थान असून त्यांच्या विचारांवर आणि नेतृत्वावर असंख्य लोकांची निष्ठा आहे. १८ नोव्हेंबर रोजी शिंदेसेनेच्या पत्रकार परिषदेत शायना एन.सी. यांनी बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो फाडून जाणीवपूर्वक विडंबन केल्यामुळे शिवसैनिकांच्या भावना दुखावल्या आहेत. या घटनेचा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने सबंध राज्यभरातून जाहीर निषेध करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने किनवट तालुका शिवसेनेच्या वतीने तालुकाप्रमुख मारोती दिवसे यांच्या नेतृत्वाखाली शिवसैनिकांच्या उपस्थितीत किनवट पोलीस ठाण्यात निवेदन सादर केले आहे.सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन शायना एन.सी. यांच्यावर तत्काळ गुन्हा दाखल करावा व त्यांना अटक करावी, अशी मागणी पोलीस निरीक्षक जगदीश मंडलवार यांच्याकडे करण्यात आली आहे. तसेच याची प्रत उपविभागीय पोलीस अधिकारी, किनवट यांना देण्यात आल्याचे वृत्त आहे.या निवेदनावर शिवसेना युवासेना तालुकाप्रमुख अतुल दर्शनवाड, शहरप्रमुख व नगरसेवक संतोष यलचलवार, नगरसेवक प्रशांत कोरडे, प्रमोद जाधव, सदानंद शिंदे, सचीन बोईनवाड, कृष्णा बैलवाड, अजय चुंगरवाड, संतोष लक्कवार, सुनिल लक्कवार आणि मोहक पांचाळ यांच्यासह आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या रब्बी पिकांना पाण्याचे कवच मिळावे-आ.भीमराव केराम

डोंगरगाव,लोणी,नागझरी शिरपूर प्रकल्पातून दोन आवर्तने सोडण्याच्या सूचना



किनवट/प्रतिनिधी-आभाळाकडे डोळे लावून पावसाची वाट पाहणारा शेतकरी आता रब्बी हंगामातील पिके जगविण्यासाठी पाण्याच्या प्रतीक्षेत आहे. मेहनतीने पेरलेले पीक केवळ पाण्याअभावी वाया जाऊ नये, शेतकऱ्यांच्या घामाचे मोल मातीमोल होऊ नये, यासाठी आ.भीमराव केराम यांनी शेतकऱ्यांच्या पाण्याचा प्रश्न आज नांदेड येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ठामपणे मांडला.

डोंगरगाव, लोणी आणि नागझरी शिरपूर प्रकल्पातील पिण्याच्या पाण्याचे आरक्षण अबाधित ठेवून उपलब्ध पाणीसाठ्यातून शेतकऱ्यांना किमान दोन आवर्तने सिंचनासाठी देण्यात यावीत, अशी आग्रही मागणी त्यांनी उपमुख्यमंत्री नामदार सुनेत्राताई पवार यांच्याकडे केली त्यांनी पाणी सोडण्याचे आश्वासन दिले.किनवट-माहूर परिसरातील शेतकरी आधीच अनियमित पाऊस आणि शेतीतील वाढत्या खर्चामुळे अडचणीत आहेत. मोठ्या कष्टाने उभ्या केलेल्या रब्बी पिकांना वेळेवर पाणी मिळाले नाही, तर शेतकऱ्यांच्या संपूर्ण हंगामावर संकट ओढवू शकते. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा साठा सुरक्षित ठेवत शेतीसाठीही पाण्याचे योग्य नियोजन करणे अत्यावश्यक असल्याचे आ. केराम यांनी बैठकीत स्पष्ट केले.आ.केराम यांच्या मागणीची दखल घेत उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी उपलब्ध पाणीसाठ्याचा आढावा घेऊन शेतकऱ्यांना दोन आवर्तने पाणी सोडण्याबाबत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.शेतकऱ्यांच्या शेतात हिरवळ फुलावी, त्यांच्या कष्टाला पाण्याची साथ मिळावी आणि त्यांच्या संसाराचा आधार असलेले पीक वाचावे, यासाठी आ.केराम यांनी सिंचनाच्या पाण्याचा प्रश्न शासनदरबारी प्रभावीपणे मांडला. उपमुख्यमंत्र्यांच्या सूचनांमुळे किनवट-माहूरच्या शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या असून, प्रत्यक्ष पाणी सोडण्याच्या कार्यवाहीकडे आता शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

बापू गायकवाड खून प्रकरणातील तिन्ही फरार आरोपी गजाआड

मुखेड पोलिसांची विशेष मोहीम फत्ते

मुखेड/प्रतिनिधी-तालुक्यातील लादगा शिवारात २१ ऑगस्ट रोजी घडलेल्या बापू गायकवाड खून प्रकरणाचा तपास आता निर्णायक टप्प्यावर पोहोचला आहे. या गुन्ह्यात गेल्या काही दिवसांपासून फरार असलेल्या उर्वरित तिन्ही आरोपींना मुखेड पोलिसांनी अटक केली असून, यामुळे प्रकरणातील सर्व सातही आरोपी आता पोलिसांच्या ताब्यात आले आहेत.

दापका(राजा) येथील रहिवासी बापू गायकवाड यांची लादगा शिवारात हत्या करण्यात आली होती. याप्रकरणी पोलिसांनी एकूण सात जणांविरुद्ध गुन्हा नोंदवला होता. त्यापैकी चार आरोपींना यापूर्वीच अटक करून त्यांची रवानगी कारागृहात करण्यात आली होती. मात्र, इतर तीन आरोपी पोलिसांना चकवा देत फरार झाले होते.अखेर १६ नोव्हेंबर रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी किरण पोपळघट व पोलीस निरीक्षक चितांबर कामठेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी विशेष मोहीम राबवत या तिघांच्या मुसक्या आवळल्या. एसआय बाबुराव बंडगर, पोलीस अंमलदार वैजनाथ मोटरगे आणि रवींद्र घुले यांच्या पथकाने ही कारवाई यशस्वी केली. मारोती ऊर्फ दीपक दशरथ जोगदंड, नामदेव शेषराव जोगदंड आणि राजकुमार श्रीपत जोगदंड (तिघेही रा. दापका(राजा) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.अटकेनंतर या तिघांनाही पोलीस कोठडीत ठेवण्यात आले असून, या गुन्ह्यामागील नेमके कारण आणि इतर धागेदोरे उघड करण्यासाठी पोलीस अधिक तपास करत आहेत.

नांदेड जिल्ह्यातील ५ हजार ७६१ शेतकरी ओटीएस कर्जमुक्तीसाठी पात्र

नांदेड/प्रतिनिधी-पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत एकवेळ समझोता घटकासाठी नांदेड जिल्ह्यातील ५ हजार ७६१ पात्र शेतकऱ्यांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. पात्र शेतकऱ्यांनी त्यांच्या हिश्श्याची दोन लाख रुपयांवरील रक्कम संबंधित बँकेत जमा केल्यानंतर त्यांना शासनामार्फत दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार आहे. या याद्या संबंधित बँक शाखा, विकास संस्था आणि ग्रामपंचायतींमध्ये उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र शासनाने २ जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार ही योजना सुरू केली असून, कर्जमाफी, एकवेळ समझोता आणि प्रोत्साहन असे तीन घटक आहेत. पहिल्या टप्प्यातील कर्जमाफी घटकांतर्गत नांदेड जिल्ह्यातील २ लाख २ हजार ७३ पात्र शेतकऱ्यांच्या याद्या आतापर्यंत प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. यापैकी आधार प्रमाणीकरण पूर्ण केलेल्या १ लाख ५७ हजार १२८ शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये १ हजार ४१६ कोटी ४० लाख रुपयांची कर्जमुक्ती करण्यात आली आहे.एकवेळ समझोता घटकासाठी प्रसिद्ध केलेल्या यादीत शेतकऱ्यांचे नाव, विशिष्ट क्रमांक, आधार क्रमांक, बँक व शाखेचे नाव, कर्जखाते क्रमांक, ३१ मार्च २०२६ अखेरची थकबाकी, ओटीएसनुसार नुसार थकबाकी, शेतकऱ्याने भरावयाची रक्कम आणि शासनामार्फत देय असलेली रक्कम यांचा तपशील नमूद आहे. पात्र शेतकऱ्यांनी यादीतील माहिती तपासून आपला हिस्सा संबंधित बँकेत जमा करावा. एकाच बँकेत एकापेक्षा अधिक कर्जखाती असलेल्या शेतकऱ्यांना त्यांच्या हिश्श्याची रक्कम कोणत्याही एका कर्जखात्यात भरण्याची सुविधा आहे. मात्र, संबंधित खात्यासाठी ओटीएस अंतर्गत निर्धारित केलेल्या रकमेपेक्षा अधिक रक्कम जमा करू नये. याबाबत शेतकऱ्यांनी बँक अधिकाऱ्यांकडून आवश्यक मार्गदर्शन घ्यावे.शेतकऱ्यांनी त्यांच्या हिश्श्याची रक्कम भरण्याची अंतिम मुदत ३१ मार्च २०२७ आहे.

कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे २५ रोजी राज्यस्तरीय धरणे आंदोलन

नांदेड/प्रतिनिधी-कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे आझाद मैदान मुंबई येथे बुधवार दि.२५ नोव्हेंबर रोजी एक दिवसीय राज्यस्तरीय धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. या आंदोलनास जिल्ह्यातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी सहभागी राहून आंदोलन यशस्वी करण्याचे आवाहन कास्ट्राईबचे विभागीय उपाध्यक्ष सतीश कदम यांनी केले आहे.

सदर आंदोलनाच्या माध्यमातून राज्यस्तरावर विविध विभागांमध्ये मागासवर्गीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना पदोन्नती मध्ये आरक्षणाचा लाभ तातडीने लागू करावा, पदोन्नतीतील आरक्षणासंदर्भात दि.२९ डिसेंबर २०१७ व ७ मे २०२१ रोजीचा शासन निर्णय रद्द करावा, सर्व शासकीय अशासकीय अनुदानित संस्थांमध्ये कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, कँन्राटी नोकर भरती करण्याचे धोरण रद्द करावे, सर्व शासकीय विभागात रिक्त पदे तातडीने भरण्यात यावीत तसेच आवश्यकतेनुसार नवीन पदांची निर्मिती करावी, शासकीय कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करावे, कौशल्य, रोजगार व उद्योजकता व नावीन्यता विभागातील पाच वर्षाहून अधिक काळ अल्प मानधनावर कार्यरत तासिका निदेशकांची सेवा तातडीने नियमित करावी तसेच भूमी अभिलेख विभागातील शिस्तेदार पदाचे नामकरण व सुधारित आकृतीबंधानुसार भूमापक परिरक्षण भूमापक पदांच्या वेतनश्रेणीची अंमलबजावणी करावी या मागण्यांसह अनेक वर्षापासून प्रलंबित विविध मागण्याचा समावेश आहे.

मतदार यादी पुनरीक्षणाची मोहीम ३० नोव्हेंबर पर्यंत; २२ डिसेंबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार

नांदेड/प्रतिनिधी-भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम-२०२६ च्या वेळापत्रकात सुधारणा करण्यात आली आहे. सुधारित वेळापत्रकानुसार ३० नोव्हेंबर पर्यंत गणना प्रपत्रांचे वितरण व संकलन करण्यात येणार असून, २२ डिसेंबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. या प्रक्रियेत सर्व राजकीय पक्ष, नागरिक आणि पात्र मतदारांनी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन ०८६ नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाचे मतदार नोंदणी अधिकारी हणमंत कोळेकर यांनी केले आहे.

विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत १८ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्यामार्फत पहिल्या टप्प्यात मतदार यादीतून वगळण्यात आलेल्या मतदारांच्या घरी भेट देऊन गणना प्रपत्रांचे वितरण व संकलन करण्यात येणार आहे. प्राप्त गणना प्रपत्रांचे संगणकीकरण करण्याची अंतिम मुदत १० डिसेंबर आहे. तसेच नोटीस टप्पा, दावे व हरकतींचा निपटारा ३१ ऑगस्ट ते १५ डिसेंबर या कालावधीत करण्यात येणार असून, अंतिम मतदार यादी २२ डिसेंबर रोजी प्रसिद्ध होईल.या कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील प्रमुख राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक मतदार नोंदणी अधिकारी यांच्या कार्यालयात घेण्यात आली. यावेळी राजकीय पक्षांनी कार्यक्रमाची व्यापक प्रसिद्धी करून मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच सर्व सहायक मतदार नोंदणी अधिकारी, पर्यवेक्षक व मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांचे १९ नोव्हेंबर रोजी प्रशिक्षण घेण्यात आले. त्यांना गणना प्रपत्रे, सूचनापत्रे आणि एएसडीडी मतदारांची यादी देऊन कार्यक्रमाची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार बीएलओमार्फत संबंधित मतदारांना गणना प्रपत्र व आवश्यक सूचना वितरित करण्यात येतील.

जाहीर प्रगटन

नांदेड येथील ५ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
(समक्ष पी.ए.खंडारे)
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१७८३/२०२६
अनुसया व इतर वि.निरंक

अर्जदार : १. अनुसया भ्र.बालाजी पुयड वय : ४५ वर्षे धंदा घरकाम, २. साईनाथ पि.बालाजी पुयड, वय : २८ वर्षे धंदा: शेती, ३. नवनाथ बालाजी पुयड वय : २३ वर्षे धंदा : शेती, ४. निरगुना पि.बालाजी पुयड, वय : २१ वर्षे धंदा घरकाम, सर्व रा.पुणेगाव, ता.जि.नांदेड.

विरुद्ध

गैरअर्जदार : निरक

प्रकरण : वारसा प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. वरील अर्जदार मयत बालाजी पि.दिगंबर पुयड यांचे वारस आहेत. मयत बालाजी पि.दिगंबर पुयड यांचा दिनांक १९/११/२०२५ रोजी मृत्यु झाला आहे. अर्जदारांनी अर्जामध्ये नमूद केले आहे की, अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नी, अर्जदार क्र.२ व ३ ही मयताची मुले व अर्जदार क्र. ४ ही मयताची मुलगी आहे.

वर नमुद अर्जदाराशिवाय ईतर कोणीही मयताचे कायदेशिर वारसदार नसल्याचे अर्जदाराने अर्जात कथन केले आहे.

तरी, प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणांस काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहून न्यायालयात दिनांक ०३/०१/२०२७ रोजी किंवा एक महिन्याच्या आत नोंदवावा, मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक २०.११.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयाने दिला.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपिक,
५ वे सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,नांदेड.

''आदेशावरून''
स्वाक्षरित/-
सहा.अधिक्षक,
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

जाहीर समन्स

नांदेड येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात
समक्ष श्री.महादेवी न.राठोड, ३ रे सह.दिवाणी न्यायाधीश
वरिष्ठ स्तर, नांदेड
विशेष दिवाणी दावा क्र.६४/२०२६

नावेद अन्वर पी.मोहम्मद अब्दुल रशीद विरुद्ध दीपमाला नागोराव पाचलिंग

प्रती,

प्रतिवादी
दीपमाला भ्र.नागोराव पाचलिंग,
वय ४४ वर्षे, धंदा-घरकाम, रा.मुदखेड, ता.मुदखेड, जि.नांदेड.
मो.९८५०२९७३४५

ज्याअर्थी उपरोक्त वादातील वादी नावेद अन्वर पी.मोहम्मद अब्दुल रशीद, वय ५९ वर्षे, धंदा-व्यवसाय, रा.इतवारा, ता.व जि.नांदेड यांनी आपल्या विरुद्ध वरीलप्रमाणे दावा दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यात आपणांस प्रतिवादी केलेले आहे. सदर प्रकरणात आपणांस आपली बाजू मांडण्याकरिता या न्यायालयातर्फे बऱ्याच वेळा अर्जात नमूद पत्त्यावर समन्स पाठविण्यात आले होते, परंतु असे दिसून येत आहे की, नमूद पत्त्यावर आपण मिळून येत नाहीत किंवा आपला ठावठिकाणा आढळत नाही, किंवा आपण जाणूनबुजून सदर प्रकरणातील समन्स स्वीकारण्यास टाळाटाळ करीत आहात.

त्याअर्थी उपरोक्त नमूद प्रकरणात आपल्या नावे हे जाहीर समन्स पाठविण्यात येत असून आपणांस याद्वारे सुचित करण्यात येते की, आपण स्वतः अगर वकिलामार्फत दिनांक २३/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता उपरोक्त प्रकरणात हजर होऊन आपली बाजू मांडावी; नसता आपणांस या प्रकरणात काहीही सांगावयाचे नाही असे समजून उपरोक्त प्रकरण आपल्या विरुद्ध एकतर्फी निकाली काढण्यात येईल.

आज दिनांक २०/११/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपिक,
दिवाणी न्याया
दि.न्या.व.स्तर,नांदेड.

आदेशावरुन,
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय,वरिष्ठ स्तर,नांदेड.

जाहीर समन्स

नांदेड येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात
समक्ष श्री एस.एम.कोलेकर, ७ वे सह.दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ
स्तर,नांदेड.
नियमित दिवाणी दावा क्र.२७१/२०२६

राहुल लक्ष्मीकांत लव्हेकर विरुद्ध मनोज प्रभाकर रोकडे

प्रती,

प्रतिवादी क्र.१,
मनोज प्रभाकर रोकडे,
वय: ४३ वर्षे, धंदा : व्यापार व शेती,
रा.आडगाव, ता.पुसद, जि.यवतमाळ.

ज्याअर्थी उपरोक्त वादातील वादी राहुल पि.लक्ष्मीकांत लव्हेकर, वय ४७ वर्षे, धंदा डॉक्टर, रा.लव्हेकर हॉस्पिटल, वजिराबाद, ता. व जि.नांदेड यांनी आपल्या विरुद्ध वरीलप्रमाणे दावा दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यात आपणांस प्रतिवादी केलेले आहे. सदर प्रकरणात आपणांस आपली बाजू मांडण्याकरिता या न्यायालयातर्फे बऱ्याच वेळा अर्जात नमूद पत्त्यावर समन्स पाठविण्यात आले होते, परंतु असे दिसून येत आहे की, नमूद पत्त्यावर आपण मिळून येत नाहीत. किंवा आपला ठावठिकाणा आढळत नाही, किंवा आपण जाणूनबुजून सदर प्रकरणातील समन्स स्वीकारण्यास टाळाटाळ करीत आहात.

त्याअर्थी उपरोक्त नमूद प्रकरणात आपल्या नावे हे जाहीर समन्स पाठविण्यात येत असून आपणांस याद्वारे सुचित करण्यात येते की, आपण स्वतः अगर वकिलामार्फत दिनांक १४/१२/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता उपरोक्त प्रकरणात हजर होऊन आपली बाजू मांडावी; नसता आपणांस या प्रकरणात काहीही सांगावयाचे नाही असे समजून उपरोक्त प्रकरण आपल्या विरुद्ध एकतर्फी निकाली काढण्यात येईल.

आज दिनांक २०/११/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपिक,
दिवाणी न्याया
दि.न्या.व.स्तर,नांदेड.

आदेशावरुन,
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय,वरिष्ठ स्तर,नांदेड.

जाहीर प्रगटन

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरी यांचे न्यायालयात
इतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.३४/२०२६
वर्षाताई वि.ग्रामविकास अधिकारी/निबंधक,ग्रामपंचायत कार्यालय,
शिरुर
जन्म आणि मृत्युची नोंदणी अधिनियम, १९६९ चे
कलम १३ (१) (३) अंतर्गत अर्ज.

अर्जदार :- वर्षाताई गंगाधर डोंगरे,वय - ३० वर्षे, धंदा घरकाम रा.शिरुर, ता.उमरी जि.नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार :- ग्रामविकास अधिकारी/निबंधक जन्म, मृत्यु नोंदणी ग्रामपंचायत कार्यालय शिरूर, ता.उमरी जि.नांदेड

प्रकरण :- जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ चे कलम १३ (१) (३) अंतर्गत अर्ज.

ज्याअर्थी, वरील अर्जदार यांनी ॲड.भिमराव जी.सवई यांच्या मार्फत जन्म व मृत्यू नोंदणी कायदयानुसार अर्ज दाखल केला असुन त्यांचे म्हणणे असे आहे की, अर्जदार यांचा जन्म दिनांक ०९.११.१९९६ रोजी अर्जदाराच्या मौजे शिरुर, ता.उमरी जि.नांदेड येथे झाला आहे. गैरअर्जदार कार्यालयाने दप्तरी नोंद घेण्याबाबतचा आदेश व्हावा यासाठीचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी, या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, याबाबत कोणास काही आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी आपला आक्षेप अथवा उजर हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात लेखी स्वरुपात दाखल करावा अन्यथा अर्जदाराचे म्हणजे ऐकुण घेवुन पुढील आदेश करण्यात येईल.

आज दिनांक १४.१०.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी देण्यात आले.

आदेशावतन
स्वाक्षरित/-
सहा. अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी न्यायालय,उमरी

लोहा-कंधारमध्ये ३८ कोटी ९३ लाखांच्या विकासकामांचा रविवारी भूमिपूजन सोहळा

आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या प्रयत्नांना यश;रस्ते,क्रीडा संकुल,नाली बांधकामांसह विविध कामांचा समावेश

कंधार/प्रतिनिधी-लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघातील विकासकामांना मोठी चालना देणाऱ्या तब्बल ३८ कोटी ९३ लाख रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचा भूमिपूजन सोहळा रविवार, दि.२२ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेल्या या विकासकामांमुळे लोहा आणि कंधार तालुक्यांतील रस्ते, पायाभूत सुविधा, क्रीडा संकुल आणि गावांतर्गत विकासाला गती मिळणार आहे.

'मातीशी नातं विकासाचं, लोहा-कंधारच्या प्रगतीचं' हे घोषवाक्य घेऊन आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यास माजी आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमाला भाजपा महिला मोर्चा प्रदेश सरचिटणीस तथा नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक संचालिका सौ.प्रणिताताई देवरे-चिखलीकर, प्रवीण पाटील चिखलीकर प्रदेश सरचिटणीस राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, शरद पवार नगराध्यक्ष लोहा,आनंदराव शिंदे माजी सभापती, बाबुराव केंद्रे माजी सभापती, संजय देशमुख सभापती, सुधाकरराव कौसल्ये उपसभापती, मन्नान चौधरी, उपनगराध्यक्ष कंधार ॲड. मुक्तेश्वर धोंडगे प्रदेश संघटन



सचिव रा.का.पा.,स्वप्निल लुंगारे प्रदेश सचिव राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, श्रीमती चित्राताई लुंगारे प्रदेश सरचिटणीस महिला राष्ट्रवादी काँग्रेस, करिम महोद्दीन मुजावर उपनगराध्यक्ष लोहा,राजेंद्र भोसीकर, अनुसयाताई केंद्रे गटनेत्या, भगवान राठोड, शंकरराव नाईक, किशनराव चेअरमन खरेदी विक्री संघ कंधार, किरण वट्टमवार माजी नगराध्यक्ष लोहा अण्णासाहेब पवार, भास्कर पवार गटनेता लोहा, छत्रपती स्वामी तालुकाध्यक्ष लोहा, मनोहर पाटील भोसीकर तालुका अध्यक्ष कंधार, बाबुराव देशमुख, नारायणराव कुंभारे, कंधार उपविभागीय अधीकारी विलास नरवटे, तहसीलदार रामेश्वर गोरे, भैरवनाथ, जिल्हा क्रीडा अधीकारी नाईकवाडी, लोहा तसीलदार विठ्ठल परळीकर, कार्यकारी अभियंता रामकृष्ण गळधर, गटविकास अधिकारी महेश पाटील, एस एन मांजरमकर, सचिन आयतलवाड उपअभियंता कंधार, जयप्रकाश तपथले, सुमित पाटील उपअभियंता लोहा, केशवराव मुकदम नगरसेवक लोहा, केशवराव कदम, धोंडिराम बोडलवार मा. जि.प. सदस्य साईनाथ कोळगीरे, साहेबराव पोटफोडे, शिवाजीराव वाकोरे, मारोतराव मजरे, अच्युत पवळे, उद्धव पाटील चितळीकर, बालासाहेब बाबाराव शिंदे, रामदास कापसे, वत्सलाबाई कदम, शंकरराव देशमुख, सुधाकरराव जाधव, नानाराव कदम, मारोती संभाजी पाटील, जनाबाई वाघमारे, मारोतराव कउटकर आणि कमलबाई वाघमारे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

दिवसभर विविध ठिकाणी भूमिपूजन

रविवारी सकाळी ९ वाजता लोहा तालुका क्रीडा संकुलाच्या कामाने कार्यक्रमाची सुरुवात होईल. सकाळी १० वाजता लोहा शहरातील विकासकामांचा लोकार्पण सोहळा, तर त्यानंतर लोहा आणि कंधार तालुक्यांतील विविध गावांमध्ये विकासकामांचे भूमिपूजन होणार आहे. सायंकाळी सावळेश्वर येथे तसेच अन्य ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. एकाच दिवशी ३८ कोटी ९३ लाख रुपयांच्या विकासकामांचा शुभारंभ होत असल्याने लोहा-कंधार मतदारसंघातील विकासाच्या दृष्टीने हा सोहळा महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

११ प्रमुख विकासकामांचा समावेश

या विकासकामांमध्ये लोहा तालुका क्रीडा संकुलाच्या सुधारणेसाठी ३ कोटी रुपये, लोहा शहरातील विविध विकास कामांसाठी ९० लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. याशिवाय लोहा तालुक्यातील रामा-४४९ रस्त्याच्या सुधारणा व रुंदीकरणासाठी ५ कोटी रुपये, कंधार तालुक्यातील कंधार-वाचोटी-वारुळ-तेलूर-कौठा रस्त्याच्या सुधारणेसाठी ५ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. तेलूर येथे गावांतर्गत सिमेंट रस्ता व बंदिस्त नाली बांधकामासाठी ३ कोटी ९९ लाख रुपये, कोठा येथे ४ कोटी ९९ लाख रुपये, शिरूर (जुने) येथे २ कोटी ९९ लाख रुपये, शिरूर (नवीन) येथे २ कोटी ९९ लाख रुपये, तसेच चौकी महाकायाळ येथे २ कोटी ९९ लाख रुपयांची विकासकामे प्रस्तावित आहेत. याशिवाय कंधार तालुक्यातील बाचोटी-सांगवी-चिखली परिसरातील रस्त्याच्या कामासाठी २ कोटी ३५ लाख रुपये आणि बाचोटी-मंगलसांगवी-चिखली-हळदा रस्त्याच्या कामासाठी ५ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

राष्ट्रवादीच्या विलिनीकरणावर भुजबळ,कोल्हेंचा नकार

झिरवाळांच्या विधानाने पक्षांतर्गत संशयाचे भूत पुन्हा चर्चेत!

मुंबई/प्रतिनिधी-राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलिनीकरणावरून मंत्री छगन भुजबळ आणि खा.अमोल कोल्हे यांनी या चर्चांना स्पष्ट शब्दांत नकार दिला आहे. जुन्नर तालुक्यातील ओतूर येथे झालेल्या राज्यव्यापी सत्यशोधक समाजाच्या अधिवेशनात भुजबळ आणि कोल्हे यांची भेट झाली. विलिनीकरणाचा कोणताही विषय नसल्याचे स्पष्ट केले. त्यातच नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यात मंत्री नरहरी झिरवाळ यांनी शरद पवार यांच्या मनातील संशयाबाबत केलेल्या विधानाने राष्ट्रवादीतील जुन्या राजकीय जखमेवर पुन्हा बोट ठेवले आहे.

राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाच्या चर्चांसोबतच त्याच जुन्या राजकीय घडामोडी पुन्हा चर्चेच्या केंद्रस्थानी आल्या आहेत. ओतूर येथील अधिवेशनाला अजित पवार गटाचे मंत्री छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील आणि शरद पवार गटाचे खा.अमोल कोल्हे उपस्थित होते. अधिवेशनापूर्वी भुजबळ आणि कोल्हे यांच्यात झालेल्या भेटीमुळे राजकीय चर्चांना उधाण आले होते. दोन्ही गटांच्या एकत्रीकरणाबाबत काही महत्त्वाची चर्चा झाली का, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मात्र, भुजबळ यांनी या चर्चांमधील हवा काढून टाकली.अमोल कोल्हे यांच्याशी भेट झाली, बोलणेही झाले; मात्र आजच्या कार्यक्रमाबाबत आणि त्यांच्या मालिकांबाबत चर्चा झाली. राष्ट्रवादीच्या विलिनीकरणावर कोणतीही चर्चा झालेली नाही. असे सांगून त्यांनी विलिनीकरणाच्या चर्चांना नकार दिला. इतकेच नव्हे, खा.अमोल कोल्हे यांनी या लोकांना अचानक विलीनीकरणावर बोलण्याची गरज का वाटू लागली, हा त्यांचा अंतर्गत प्रश्न आहे. आमच्याकडे अशा कोणत्याही चर्चा सुरू नाहीत, असे कोल्हे यांनी स्पष्ट केले. केवळ माध्यमांतील चर्चांवरून त्यांच्यावर राजकीय शिक्का मारणे योग्य नाही, असे सांगत त्यांनी रोहित पवार यांच्याबाबतच्या चर्चांना पूर्णविराम देण्याचे आवाहन केले.

झिरवाळांच्या एका विधानाने जुने बंड पुन्हा ऐरणीवर!

दुसरीकडे, नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यातील जलधारा येथे भगवान बिरसा मुंडा जयंती कार्यक्रमात मंत्री नरहरी झिरवाळ यांनी केलेल्या विधानाने राष्ट्रवादीतील अंतर्गत राजकारण पुन्हा चर्चेत आले. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आदिवासी समाजातील कार्यकर्ते जयंत वानोळे यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाला झिरवाळ यांनी उपस्थिती लावली होती. खा.शरद पवार यांच्या डोक्यात माझ्याबद्दल संशयाचे भूत राहत नाही, असे झिरवाळ यांनी स्पष्ट केले. मात्र, पवार यांच्या मनात नेमके कोणाबद्दल संशयाचे भूत आहे, झिरवाळांच्या विधानामुळे त्या जुन्या चर्चांना पुन्हा उजाळा मिळाला आहे.

उमरी (बाजार) ग्रामपंचायत भ्रष्टाचार प्रकरणी गटविकास अधिकाऱ्यांच्या आश्वासनानंतर उपोषण स्थगित

सरपंचांचे आर्थिक व्यवहार व खरेदीचे अधिकार गोठवण्याचे आदेश

किनवट/प्रतिनिधी-उमरी बाजार ग्रामपंचायतीच्या भ्रष्ट कारभाराविरुद्ध सुरू असलेल्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर गटविकास अधिकाऱ्यांनी दिलेल्या १९ नोव्हेंबर रोजीच्या ठोस कार्यवाहीच्या आश्वासनानंतर जीवन कोटरंगे यांच्यासह पाच उपोषणार्थींनी उपोषणाला पूर्णविराम दिला आहे.उपोषण थांबल्याच्या दिवसापासून सरपंचांचे सर्व आर्थिक व्यवहार तसेच खरेदीचे नमुने गोठवण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. प्रदीर्घ संघर्षानंतर गटविकास अधिकाऱ्यांनी हा निर्णय घेतला आहे. सुस्ताड यंत्रणेमुळे ग्रामस्थांना वेठीस धरल्या जात असल्याबद्दल कोटरंगेंनी तीव्र नाराजी व्यक्त केलीय.

उमरी बाजार ग्रामपंचायतीत एकतर्फा भ्रष्टाचाराची मालिका सुरूच होती. जीवन कोटरंगे यांच्यासह अन्य पाच जणांनी अनेक दिवसांपासून त्याविरुद्ध आवाज बुलंद केला होता. गटविकास अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमधील कागदी कलगीतुरा हा वेळ काढूपणाचा पहायला मिळाला. शेवटी उपोषणाच्या अस्त्राचा अवलंब करावा लागला. १९ नोव्हेंबर रोजी गटविकास अधिकाऱ्यांनी गंभीर दखल घेत ठोस लेखी आश्वासन दिल्याने उपोषणाला मागे घेतल्याचे सांगण्यात आले.१९ नोव्हेंबर पासूनच सरपंच पदाचे सर्व आर्थिक व्यवहार गोठवले जातील, तसेच खरेदीचे नमुनेही गोठवण्यात येतील. तत्कालीन गटविकास अधिकाऱ्यांचा प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवण्यात आल्याचे पत्रात नमूद आहे. तसेच सेवानिवृत्त विस्तार अधिकारी वसंत वाघमारे यांचा खुलासा मागवण्यात आला असून, तो प्राप्त झाल्यानंतर योग्य ती कार्यवाही केली जाणार असल्याचे सांगितले आहे.

१५ दिवसांत निकाली काढण्याचे आश्वासन

नमूद १ ते ५ मुद्द्यांची चौकशी करून योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल. या सर्व प्रकरणांची माहिती १५ दिवसांत निकाली काढण्यात येईल, असेही पत्रात नमूद केले आहे. दरम्यान, गटविकास अधिकाऱ्यांकडून देण्यात आलेल्या आश्वासनांच्या पार्श्वभूमीवर उपोषणार्थींनी उपोषण मागे घेतल्याचे जीवन कोटरंगेंनी नांदेड वार्ताशी बोलताना सांगितले.

वडिलांवरील आर्थिक भार टाळण्यासाठी मोहम्मद अदीबचा मोठा निर्णय

एमबीबीएसऐवजी बीएएमएसला पसंती

कंधार/प्रतिनिधी-डॉक्टर होण्याचे स्वप्न उराशी बाळगून जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर वैद्यकीय शिक्षणासाठी पात्र ठरलेल्या मोहम्मद अदीब रफीक याने आपल्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन एक कौतुकास्पद निर्णय घेतला आहे. एमबीबीएस प्रवेशाची संधी उपलब्ध होऊनही वडिलांवर आर्थिक कर्जाचा अतिरिक्त भार पडू नये, या संवेदनशील विचारातून त्याने एमबीबीएसऐवजी बीएएमएस शिक्षण घेण्याचा निर्णय घेतला. त्याच्या या निर्णयाचे कंधार तालुक्यातून कौतुक होत आहे.

अदीबने पहिल्या प्रवेश फेरीत एमबीबीएसची संधी हुकल्यानंतर नांदेड येथील शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयात बीएएमएस प्रवेश निश्चित केला होता. त्यानंतर झालेल्या विशेष फेरीत त्याला पुन्हा एमबीबीएसची जागा मिळाली. मात्र, प्रवेश निश्चित करण्यासाठी अवघ्या एका दिवसात साडेनऊ लाख रुपये भरण्याची अट होती. मुलाचे डॉक्टर होण्याचे स्वप्न पूर्ण व्हावे, यासाठी वडिलांनी घर गहाण ठेवून पैसे उभे करण्याचीही तयारी दर्शविली होती.मात्र, वडिलांवर कर्जाचा बोजा वाढू नये आणि कुटुंब आर्थिक अडचणीत सापडू नये, या विचाराने अदीबने एमबीबीएसची संधी सोडून बीएएमएसचे शिक्षण सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला. स्वतःच्या स्वप्नापेक्षा कुटुंबाची आर्थिक परिस्थिती आणि वडिलांच्या कष्टांना प्राधान्य देणाऱ्या अदीबच्या या निर्णयातून त्याची संवेदनशीलता, कर्तव्यभावना आणि परिपक्व विचारसरणी दिसून येते.अदीबच्या या निर्णयाची दखल घेत कंधार नगरपालिकेचे मुख्याधिकारी संदीप भोळे यांनी त्याचे स्वागत करून त्याच्या निर्णयाचे कौतुक केले. तसेच पुढील वैद्यकीय शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. आर्थिक परिस्थितीवर मात करीत जिद्द, मेहनत आणि कुटुंबाप्रती असलेली जबाबदारी जपणाऱ्या अदीबचा आदर्श इतर विद्यार्थ्यांसाठीही निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे.

हदगाव शहरातील ११ कोटींच्या विकासकामांचा हिशेब द्या!

चौकशीच्या आश्वासनानंतरही कारवाई नाही;बालाजी पा.बाभळीकर आमरण उपोषणाच्या पवित्र्यात

हदगाव/प्रतिनिधी-हदगाव शहरात सुरू असलेल्या ११ कोटीच्या विविध विकास कामांमध्ये कथित अनियमितता, निकृष्ट दर्जाची कामे तसेच सार्वजनिक निधीच्या वापराबाबत पारदर्शकतेचा अभाव असल्याच्या मुद्द्यावरून पुन्हा एकदा आंदोलनाचे वातावरण निर्माण झाले आहे.या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी शेतकरी संघटनेचे नांदेड जिल्हाध्यक्ष बालाजी पा. बाभळीकर यांनी २६ नोव्हेंबरपासून पुन्हा बेमुदत आमरण उपोषण सुरू करण्याचा इशारा दिला आहे.

दि.१९ नोहेबर २०२६ च्या उपविभागीय सार्वजनिक बांधकाम उपविभाग हदगाव यांना दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, यापूर्वीही सार्वजनिक बांधकाम उपविभागा हदगांव समोर आमरण उपोषण केले होते. त्यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी चौकशी समिती स्थापन करून २० दिवसांच्या आत चौकशी पूर्ण करण्याचे तसेच दोषींवर नियमानुसार कारवाई करण्याचे लेखी आश्वासन दिले होते. मात्र, या आश्वासनांची प्रत्यक्षात कितपत अंमलबजावणी झाली, चौकशी समितीने नेमका काय अहवाल सादर केला आणि संबंधित कामांची जबाबदारी निश्चित झाली का?, असे प्रश्न आता उपस्थित होत आहेत.हदगाव शहरातील कोट्यावधी रुपयांच्या कामे सार्वजनिक बांधकाम उपविभाग हदगांवकडे वर्ग करण्यात आली आहे.विविध विकास कामांबाबत अंदाजपत्रके, तांत्रिक मान्यता, कामांचा दर्जा, मोजमाप पुस्तिका (एम.बी.) आणि देयकांची सखोल तपासणी करण्यात यावी, अशी प्रमुख मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे. यापूर्वी उपोषणादरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी भेट देऊन चौकशीचे आश्वासन दिले होते. मात्र, प्रशासनाने दिलेल्या मुदतीत ठोस कार्यवाही न झाल्याचा आरोप बाभळीकर यांनी एका निवेदनाद्वारे केला आहे.आश्वासनांची पूर्तता न झाल्यास आंदोलन तीव्र करणार लोकशाही मार्गाने वारंवार निवेदने देऊन, आंदोलने करूनही नागरिकांच्या पैशातून होणाऱ्या विकासकामांबाबत समाधानकारक उत्तर मिळत नसेल, तर सर्वसामान्य नागरिकांनी न्याय मागायचा कोणाकडे?, असा सवालही निवेदनात करण्यात आलेला आहे. सार्वजनिक निधीचा प्रत्येक रुपया जनतेच्या हितासाठी खर्च झाला पाहिजे. विकासकामांमध्ये पारदर्शकता असली पाहिजे. आणि चौकशीअंती दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई झाली पाहिजे, अशी ठाम भूमिका बाभळीकर यांनी व्यक्त केली आहे.आता २६ नोव्हेंबरपासून प्रस्तावित आमरण उपोषणाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन आणि सार्वजनिक बांधकाम विभाग कोणती भूमिका घेतात, याकडे हदगाव शहरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे. प्रशासनाने यापूर्वी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करून चौकशीचा अहवाल सार्वजनिक करावा, अशी मागणीही नागरिकांमधून होत आहे.

तब्बल आठ वर्षानंतर सोयाबीनची ८ हजाराकडे वाटचाल

देगलूर/प्रतिनिधी-जागतिक बाजारपेठेत सोयाबीनची निर्माण झालेली टंचाई आणि महाराष्ट्रात पडलेला भीषण दुष्काळ यामुळे यंदा खरीप हंगामातील मुख्य पीक असलेल्या सोयाबीनला मोठा फटका बसला आहे. बाजारपेठेत सोयाबीनची आवक प्रचंड घटली असली, तरी जागतिक स्तरावर दर वाढल्यामुळे मराठवाड्यात सोयाबीनची प्रतिक्विंटल दर तब्बल साडेसात ते आठ हजार रुपये आकडे झेपावले आहेत.

तब्बल आठ वर्षानंतर सोयाबीनला हा विक्रमी दर मिळाला असला, तरी दुष्काळामुळे ८० टक्के शेतकऱ्यांकडे मालच शिल्लक नसल्याने बळीराजांच्या हाती निराशाच पडली आहे. नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बीड, धाराशिव, जालना व छत्रपती संभाजी नगर या जिल्ह्यात मागील १०-१५ वर्षात सोयाबीन हे प्रमुख नगदी पीक बनले आहे. लातूर व नांदेडच्या औद्योगिक वसाहतीत प्रक्रिया केंद्रीय उभी राहिल्याने सोयाबीनला मोठी मागणी राहिली. मात्र २०१४ ते २०२६ या प्रदीर्घ काळात सोयाबीनचे दर साडेचार ते पाच हजार रुपयांच्या पुढे गेले नव्हते. यंदा 'एल निनो'च्या प्रभावामुळे मराठवाड्यात पावसाने ओढ दिल्याने शेतीतील पिके करपून गेली. केवळ ३० टक्के भागात विहिरी व बोरवेलच्या पाण्यावर जेमतेम पीक जगवले गेले, परंतु कापणी व मळणीच्या खर्चातच त्यातील मोठा वाटा गेला, सध्या देगलूर, नांदेड, लातूर आणि धाराशिव बाजार समितीमध्ये अत्यंत मर्यादित आवक होत आहे. सुरुवातीला ५ हजार रुपये मिळणारा दर आता ८ हजार रुपयांच्या उंबरठ्यावर पोहोचला आहे. सिंचनाच्या जोरावर पीक वाचविलेल्या अवघ्या २० टक्के शेतकऱ्यांना या दरवाढीचा काहीसा दिलासा मिळाला आहे. परंतु उर्वरित ८० टक्के शेतकऱ्यांची कोठारे रिकामीच आहेत. यंदा जून, जुलै आणि ऑगस्ट या तीनही महिन्यात पावसाने मोठा खंड दिल्याने पेरलेले संपूर्ण सोयाबीन वाया गेले. नदीकाठच्या पिकाला थोडाफार आधार मिळाला, मात्र हातात पीकच न आल्याने ८ हजार रुपये प्रति क्विंटल भावाचा शेतकऱ्यांना काहीच फायदा नाही, अशी हातबल प्रतिक्रिया देगलूर तालुक्यातील शेतकरी व्यक्त करीत आहेत.

पान १ वरुन

पाकिस्तानचे मंत्री...

स्थापत्य कलेचे उत्तम नमुना असलेले आणि जगातील आश्चर्यांपैकी एक असलेली ही वास्तू पाहण्यासाठी ते जाणार आहेत. याचबरोबर त्यांनी दिल्लीतील हजरत निजामुद्दीन दरग्यात जाण्याचीही इच्छा व्यक्त केली होती. पण सुरक्षेच्या कारणामुळे ही परवानगी नाकारण्यात आली. ते आता ताजमहलसोबत इतर चार ऐतिहासिक ठिकाणांना भेट देणार आहे.

माजी आ.पोकर्णांच्या...

सीसीटीव्ही कॅमेऱ्यात चित्रित झाले असून, या फुटेजमुळे घटनेची गंभीरता समोर आली आहे.दरम्यान, या प्रकरणामागे जुना व्यावसायिक वाद आणि आर्थिक देवाणघेवाणीचे कारण असल्याचे बोलले जात आहे. हरजी राजेगोरे हा पूर्वी कपिल पोकर्णा यांच्याकडे चालक म्हणून काम करीत होता. सुमारे तीन वर्षांपूर्वी त्याच्याकडील दहा ट्रक पोकर्णा यांनी भाडेतत्त्वावर घेतले होते. मात्र, ट्रकचे भाडे देण्यावरून दोघांमध्ये वाद निर्माण झाल्याची माहिती आहे. त्यानंतर राजेगोरे याला कामावरून कमी करण्यात आले. तसेच त्याच्या ट्रकना काम मिळत नसल्यामुळेही त्यांच्यात वाद वाढल्याचे सांगण्यात येते.या पार्श्वभूमीवर राजेगोरे याने फोनवरून अनेकदा धमक्या दिल्याचा आरोप कपिल पोकर्णा यांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीत केला आहे. तब्बल ४० लाख रुपयांच्या आर्थिक व्यवहारातून हा प्रकार घडल्याचा दावाही त्यांनी केला आहे.

विठ्ठलचरणी दुष्काळमुक्त...

हार अर्पण करण्यात आला. फुले आणि कोयऱ्यांच्या नक्षीकामाने हा हार सजविण्यात आला होता.शासकीय महापूजेचा मान यंदा नांदेड जिल्ह्याला मिळाला. हदगाव तालुक्यातील उंचेगाव येथील सुधाकर शिंदे आणि प्रणिता शिंदे या वारकरी दाम्पत्याला मानाचा वारकरी म्हणून पूजेत सहभागी होण्याचा बहुमान मिळाला.

पद्मविभूषण गोविंदभाई...

व्यक्त करण्यात आली.या प्रसंगी नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए (डॉ.) प्रवीण सदाशिवराव पाटील, सचिव प्रा. श्यामलताई दीपनाथ पत्की कुरुंदकर, सहसचिव ॲड. प्रदीप नागापूरकर, कार्यकारिणी सदस्य तथा नगरसेविका शांभवी साले, प्राचार्य डॉ. एल. पी. शिंदे, प्राचार्य डॉ. विकास सुकाळे, मुख्याध्यापक प्रशांत चौधरी, उपप्राचार्य विशाल पतंगे, प्रा. सौ. अरुणा शुक्ला, प्रा. एकनाथ खिल्लारे, नवज्योतसिंग जहागीरदार, प्रा. विलास वडजे, श्री. रासे, श्री. जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ.मनोहर थोरात यांची सहयोगी प्राध्यापकपदी निवड

किनवट/प्रतिनिधी-सरस्वती विद्यामंदिर कला महाविद्यालयातील समाजशास्त्र विषयाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ.मनोहर कुंडलिकराव थोरात यांची शासनासह विद्यापीठाने नुकतीच (असोसिएट प्रोफेसर) सहयोगी प्राध्यापक म्हणून निवड केली.



संशोधन ग्रंथ लेखन अध्ययन व अध्यापनात त्यांनी महाविद्यालयाचा लौकिक उंचावला असून आपल्या विषयाची विद्यार्थ्यांमध्ये गोडी निर्माण होण्यासाठी सातत्याने डॉ. थोरात हे नेहमीच प्रयत्नशील असतात. त्यांच्या एकूणच कार्याची दखल घेत सहयोगी प्राध्यापक म्हणून निवड केल्याबद्दल महाविद्यालयासह सर्वस्तरातून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.उपक्रमशील प्राध्यापक म्हणून स्थानिकच्या सरस्वती महाविद्यालयात त्यांची ओळख असून राष्ट्रीय सेवा योजनेच्या विभागाचे कार्यक्रम अधिकारी म्हणून ते सध्या महाविद्यालयात कार्यरत आहेत. त्यांच्या सहयोगी प्राध्यापकपदी निवड झाल्याबद्दल सरस्वती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व्यंकटराव नेमानीवार, प्राचार्य कृष्णकुमार नेमानीवार, उपाध्यक्ष आदिवरद किरण नेमानीवार, सर्व मान्यवर विश्वस्त तसेच महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रोफेसर डॉ.मार्तंड कुलकर्णी, पूर्व प्राचार्य तथा मराठी विभाग प्रमुख डॉ.आनंद भंडारे यांच्यासह सर्व प्राध्यापकँ, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

यशपाल सिंह परमार यांचे निधन



नांदेड/प्रतिनिधी-शहरातील चिराग गल्ली येथील रहिवासी यशपाल सिंह परमार (वय ५६) यांचे शुक्रवार, दि.२० नोव्हेंबर रोजी औरंगाबाद येथील रुग्णालयात उपचारादरम्यान हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच नातेवाईक, मित्रपरिवार व परिसरातील नागरिकांनी शोक व्यक्त केला. शनिवार, दि. २१ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता त्यांच्या निवासस्थानापासून अंत्ययात्रा काढण्यात आली. जुना मोंढा येथील रामघाटावर त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात भाऊ, बहीण, दोन मुले, तीन मुली, नातवंडे, जावई व सुना असा परिवार आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com मो.९४२२१७४७७४